# प्रकरण - तिसरे

## नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथालेखनातील अभिव्यक्ती


३.१ भाषाशैली
३.२ निवेदनशैली
अ) प्रथमपुरूषी निवेदन
ब) तृतीय पुरूषी निवेदन
३.३. संवादलेखन
३.४ अनुभवविश्व आणि समाजदर्शन
३.५ कथावस्तू

# नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथालेखनातीलअभिव्यक्ती

याआधीच्या प्रकरणातून ग्रामीण कथेची प्रेरणा, स्वरूप, वाटचाल तसेच 'काफिला' आणि 'संदर्भ' या दोन कथासंग्रहातील आशयसुत्रे यांचा विचार केला. या प्रकरणात वरील कथासंग्रहातील कथांतील अभिव्यक्ती विशेषांचा विचार करावयाचा आहे. अभिव्यक्तीचा अभ्यास करताना त्यामध्ये त्या कथासंग्रहात येणारी भाषाशैली, निवेदनशैलीची पद्धत, संवादलेखन कथावस्तू तसेच त्यामध्ये येणारे अनुभवविश्व आणि समाजाचे दर्शन कितपत येते याचा अभ्यास करण्याचा विचार केला आहे.

लेखक जेंव्हा साहित्य निर्माण करतो, त्यावेळी सर्व गोष्टींचे भान त्यांना असते. त्यावेळी समाजात घडणारे वेगवेगळे घटक याची योग्य पकड ते घेतात. मात्र ते मांडत असताना भाषा कशी वापरायची, त्याचे निवेदन कसे करायचे, त्याचप्रमाणे वाचकाला कशाप्रकारे आवडेल, त्यातून आपण जे सांगणार आहोत तो कशाप्रकारे बोध होईल या सर्वांचा विचार करून साहित्यकार साहित्य मांडत असतो. प्रत्येक साहित्यकाराची एक शैली असते . जसे पंचा म्हटले की गांधी, तर गुलाब म्हटले तर नेहरू आठवतात त्याप्रमाणे त्या त्या शैलीमध्ये लेखकाची ओळख होते.

## ३.१) भाषाशैली :

विचार व भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणजे भाषा. भाषा हा कथेचा प्रमुख घटक आहे. कथेची भाषा ही काव्यासारखी नसते, ती शक्यतो व्यवहारी जीवनातील असते. संवादात्मक असे हे लेखन असते , त्यामुळे कथेची भाषा साधी, सोपी, सरळ, अथगर्भ अशी असावी. कथेमधून काहीतरी घेण्यासारखे, समजेल, उमजेल अशी कथा असावी. कथेतील अनुभव आणि त्या कथेतील पात्रांचा स्वभाव भाषेमुळे समजतो ,त्यामुळे ती भाषा परिणामकारक अशी असते. लेखकाला जो विचार, भावना, अनुभव, स्वभाव व्यक्त करावयाचा आहे तो भाषेद्वारेच व्यक्त करतो. त्यामुळे वाचकाला आकर्षित करण्यासाठी भाषाशैलीला महत्त्व आहे. ती अलंकृत असावी कारण साहित्य हा समाजाचा आरसा असतो . तो त्याद्वारे समाजाला अनेक प्रकाराचे बोध देतो . इंद्रधनुष्याचे सप्तरंग

तो आरशात पाडत असतो. म्हणजेच समाजातील सर्व सुख,दु:ख यांचा आविष्कार त्यांच्या साहित्यात मांडत असतो. ते वाचकवर्ग यांच्यापर्यंत पोहचवण्यासाठी तशी शैली मांडत असतो.

भाषा आणि आशय यांचा घनिष्ट संबंध आहे. कारण भाषेच्या माध्यमातून कथेचा आशय परिणामकारक असतो. समाजातील वेगवेगळे प्रकार स्पष्ट करताना वातावरण आणि समाजातील काही व्यक्तींचे संदर्भ ती प्रकट करते. म्हणजेच व्यक्ती जशी भाषा वापरते तशीच तीमधून प्रकट होते.भाषा ही अनेक प्रकारचे कार्य करते. विविध भावनांची देवघेव करणे, भावनांचे प्रकटन करणे हे मुख्य काम भाषेचे असते. लेखक स्वत:ची अशी एक शैली निर्माण करतो, किंबहुना तो जे लिहितो त्यामधून त्यांची विशिष्ट अशी शैली अभिव्यक्त होत असते. भाषाशैली संदर्भात प्रा.ना. सी. फडके यानी म्हटले आहे, 'भाषाशैली अंगी आणावयाची असेल तर शब्दांचे अर्थ व ध्वनी यांच्या संवाद विसंवादाचा तर लेखकाने अभ्यास केलाच पाहिजे, पण शब्दांच्या योगाने बनणाऱ्या वाक्यातही अनेकप्रकारचे नादगुण कसे उत्पन्न होतात व त्यांचा अर्थपरिपोषाकडे कसा उपयोग करता येईल याचाही सूक्ष्म विचार त्यास फार सहाय्यक होईल... प्रत्येक सुंदर वाक्यास एक प्रकारची लय असते.''[१]

नागनाथ कोत्तापल्ले यांची भाषा साधी, सोपी, सरळ आहे, तसेच भाषा आकर्षक आहे. त्यामध्ये त्यांनी अलंकार, वाक्यप्रचार, म्हणी, कल्पनाविलास यांचा उपयोग केला आहे. त्यांच्या कथामधून एक प्रकारचा नाद, लय दिसून येते. नामांची, विशेषणांची, क्रियापदांची तर केंव्हा प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचक चिन्ह यांची पुनरावृत्ती केलेली आहे हे दिसून येते.

'' चिमणी चिवट - तिने हिसडा मारला. बाजूला सरकली एक क्षणभर तडफडत अधांतरी चिमणा.. तर तेवढ्या अवधीत चिमणीने संधी साधून एक जोरकस चावा घेतला.. चिमणी चावते ? ...''[२]

या चिमणा चिमणीच्या स्वरूपात या कथेतील नायक - नायिका यांच्यात फोनमुळे निर्माण झालेला तणाव प्रकट केला आहे त्यामध्ये त्यांच्यांत होणारी बाचाबाची

याचे चित्रण नकळत होऊन जाते. असे वेगवेगळे संदर्भ घेऊन कथाशैली मांडली आहे.

'नाही हो बाबा, रात्रीच्या वेळी राक्षस हिंडतात ना? कुणी तरी दोन राक्षस रस्त्याने मोठमोठ्याने हसत चालले होते. दारूडे राक्षस होते की काय कुणास ठाऊक. चिमणी इतकी घाबरली की तिने पटकन् घराच्या खिडक्याच बंद केल्या आणि एकदम झोपीच गेली.'३ यातून मुख्य दिसते ते लहान मुलीचे बोल, त्यातून होणारे समाजाचे दर्शन. म्हणजेच घरी एखाद्या व्यक्तीवरून काय बोलतात ते कोणालाही कोणताही प्रत्यय लावून बोलने जरी समजले नसले तरी आणि हेच चित्रण जसेच्या तसेच कोत्तापल्लेनी मांडले आहे. असेच वेगवेगळ्या शैलीत त्यानी कथा लिहिल्या आहेत. प्रश्नचिन्हांची पुनरावृत्तीत भाषाशैली मांडण्याची लकब -

'' किती वाजले?

बारा

किती वाजले ?

बारा पाच

किती वाजले ?

बारा दहा.'' ४

'' हसणारे लाखो करोडो तांडे. टिचभर खळगीसाठी कोण यातना? फुलपाखरानंही त्यासाठी झुरांव मरावं हा कुठला न्याय ? थुंकीनंही आतल्या आत परतावं ह कुठला न्याय ? आणि आतल्या लाव्हानं उफाळण्याचं केवळ स्वप्नच बघावं हा कुठला न्याय ?''५

'' काढल्यानंतर काय खाशील ? काय करशील तू?''

''काय करीन ? काय करीन ना ?'' ६

' वागवा' म्हणजे काय बरं? सांभाळून कसं वागायचं? आणि आपण काय वागवणार? ती घरात राहणार '[७]

'काय रे सुरेश असा मध्यरात्री का आलास?'[८]

' हे सगळं काय आहे? आपण कुठे आहोत ? सुरेशचे आपले नाते तरी काय आहे? आणि... ताईची सुटका झाली असेल का? काय झाले असेल तिला ?'[९]

'हार घालताना तिचे डोळे थोडे चमकले. का? थोडी हसली का ती ? ही का हसली असेल ? काही म्हणजे काही कळत नाही या बायकांचे ... आणि आता ही कायम आपल्याकडेच राहणार कायम? '[१०]

' बोलता बोलता सतत तिची भीती 'मी वाईट आहे कां रे ?' 'मी पापी आहे का रे?' ' पाप म्हणजे काय रे ?' ... '[११]

'डिसुझा, तुला काही कळतं की नाही? अरे वेळ कोणती? काळ कोणता? आणि तू हसतोस? ''[१२] समाजात अशा काही व्यक्ती असतात की दहावेळा एकच प्रश्न विचारत असतात. तर काही व्यक्ती स्वत:च्याच मनाला अनेक प्रश्न एकाचवेळी विचारतात.काही व्यक्ती दुसऱ्याला प्रश्न असे विचारतात, की त्याला उत्तरे देता येत नाहीत, असे वेगवेगळे प्रकार त्यांच्या साहित्यामध्ये दिसून येतात. महत्त्वाचे म्हणजे एकाच वाक्यात अनेक प्रश्नांची पुनरावृत्ती मांडून भाषाशैलीत सौंदर्य कोत्तापल्ले यांनी आणले आहे.

प्रश्नचिन्हाप्रमाणेच, उद्‌गारवाचकाची पुनरावृत्ती त्यांच्या साहित्यातून दिसून येते हे त्यांच्या भाषाशैलीचे महत्त्व आहे.

'छ्या! ह्यापेक्षा ती सामंतबाई बरी !'[१३]

'' मुर्खच आहेस झालं ! अरे आज एकोणतीस ऑगस्ट बरोबर आज एक वर्षापूर्वी आपण भेटलो होतो तो दिवस! त्या दिवसाचा आज वाढदिवस आहे'' १४

'' म्हणून त्वरा करा! त्वरा करा !! आत्ताच एक कोपरा रिझर्व करा.''१५

“ तसा नाही ना रे तू ! नाहीस ना रे ! हो म्हण ना रे .. ” [१६]

“ बापरे! म्हणजे पुन्हा सांभाळणं आलंच आणि आपल्यालाच सांभाळावं लागेल तर! सुंदर बायको जगातली अवघड गोष्ट.” [१७]

‘ तो धावतो आहे ... तिरकीट धैत!.. ता धिन् धिन्ना! ... ” [१८]

‘ वा! बहोत खुब कल्पना! पन कटली पाहिजेत दोघंही.” [१९]

दुसऱ्यांना उपदेश देण्यासाठी काही वेळेला मनात होणाऱ्या एखाद्या गोष्टीच्या चलबिचलविषयी तसेच एखादी आठवण करून देण्यासाठी विशेष ढंगात बोलण्याची एक लकब असते. एखाद्याला समजावून सांगण्यासाठी वापरलेले शब्द, आनंद, दु:ख, आश्चर्य इत्यादी भावना व्यक्त करण्यासाठी नकळत आपल्या तोंडून उद्‌गारवाचक शब्द बाहेर पडतात. हे शब्द जसेच्या तसे कोत्तापल्लेंनी मांडले आहेत पण महत्त्वाचे ते असे की एकाच गोष्टीसाठी काही ठीकाणी दोन वेळा तर काही ठिकाणी तीन वेळा उद्‌गारवाचक चिन्ह येत असताना दिसतात. त्याच्या लिखानामध्ये हे एक वेगळेपण वाटते.

या कथांमधून शब्दांची पुनरावृत्तीसुद्धा केली आहे. काही वेळेला भितीमुळे किंवा एखाद्या गोष्टीत गुंतलेली असल्यामुळे तेच ते शब्द पुन्हा, पुन्हा येत असलेले दिसतात. एखाद्या विषयांत चिंताग्रस्त असताना किंवा आनंदाच्या प्रसंगी असे शब्दउच्चार जास्त प्रमाणात येतात.

“ हे तान्या शेवटी सवड सिंधू म्हणजे निर्णय सागर हो. सागर निर्णय ... निर्णय सागर ...’ आणि झुलत ते प्रेत घेऊन प्रवाहाकडे निघालेही. ” [२०]

‘ ज्वाला - ज्वाला - आसमंताला भिडणाऱ्या - आसमंतभर - हास्याच्या ज्वाला - ज्वालांचे हास्य - मी जळतोय उभा जळतोय - आता संपणार जळून राख होणार - संपणार एका नशेत एका तप्त अंगारात संपणार संपणार - संपलोच!” [२१]

‘ हे युधिष्ठिरा, सडलेल्या गुलमोहराची शपथ तुला, पहिल्या धारेची शपथ तुला, कोपऱ्यातल्या ओघळांची शपथ तुला, तसाच जपून ठेव तू तो लाव्हा अंतरंगात

उकाळणारा. आणि वाट पाहा ... वाट पाहा...'' [२२]

काही कथांमधून हिंदी वाक्यांचा वापर केला आहे, त्यामुळे कथेला एक वेगळेपण आले आहे.हिंदी शब्दांचा वापर शक्यतो मुसलमान व्यक्तींच्या तोंडून जसे आलेत तसेच मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'मग कोर्टच म्हणालं, '' भै, कुछ इंटिमेशन नही, खत नही और ये शामका वक्त ढूंडके कैसे आये?''

तसं डॉ.शकीलानीउरलेला पेग सरळ रिचवला. मग नि:संकोचपणे डॉ. शकील बोल लागले,

'' भै काम तो है ही औरच होनाच पडता.''

'' ठीक है जैसा आप कहते वो मान लेंगे. मगर बताइये तो सही.''

' मामुलीसा का है! ' [२३]

अशाच हिंदी वक्यांचा वापर ' हकिकत वास्तवातली' या कथेत दिसून येतो

-

'' बेटे '' मी दचकून थबकलो.

मग म्हणाला, '' घबराने की बात नही. जरा तुम्हारेसे काम था ।''

'' बोलो ना ? ''

'' नहीं जरा टेम लगेगा.''

'' चलो मेरे साथ बात करते जायेंगे.'' [२४]

'' मग म्हणायचं, हा हा हाऽऽ जो भी मेरे पंजेमे आता है उसे लुटना मुस्कील है । चलो करो मेरे उपर प्यार.'' [२५]

काहीवेळा गंमतीने भाषा बदलून बोलायची सवय लोकांना असते त्याप्रमाणे

काही ठिकाणी अशी भाषा वापरलेली दिसून येते. यामुळे अस्सलपणा दिसून येतो.

काव्याचा वापर काही कथांतून केला आहे. एका ठिकाणी त्यांनी स्वत: काव्य लिहलंय तर एका ठिकाणी कथेचा आशय दाखवण्यासाठी ज्ञानेश्वरीतील चौथ्या अध्यायामधील एक ओवी लिहली आहे.

'' माझी स्वतंत्रता तरी न मोडे ।

परि कर्मधिनु ऐसा आवडे ।

तेही भ्रांतिबुद्धी तरी घडे ।

एरवी नाही ।।

की एकचि दिसे दुसरे ।

ते दर्पणाचेनि आधारे ।

एरव्हीं काय वस्तुविचारि ।दुजे आहे ।। ४६ - ४७'' [२५]

ही ओवी ज्ञानेश्वरीतील घेतली असली तरी त्यांनी या ओवीद्वारे कथाआशय मांडला आहे, त्यामुळे त्यांच्या भाषाशैलीत वेगळेपण आलेले आहे.

' कोणती पुण्ये अशी येती फळाला' [२६]

ही महानोरांची ' रानातल्या कविता' यामधील घेतलेली ओळ आहे.

'' भुंकतात कुत्री । आणि माणसेही ।

जाणवे तेथिची । तोंड गल्लीचे ।।

गल्लीच्या तोंडाशी । भेगाळे गायक ।

आणखी नायक । हिंडतात ।।

रमावे तेथेचि ढोसावा सिंगल ।

दिसाची विश्रांती । कोपऱ्यात '' २७

या कवितेमध्ये त्यांनी पूर्ण कथेचे सार मांडले आहे म्हटले तरी चालेल. गावचे, गावच्या गल्लीबोळाचे अस्सल चित्रण यामध्ये दिसते.

यांच्या भाषाशैलीचे आणखी एक वैशिष्ट्य जाणवते त्यांनी ग्रामीण शब्द रचना असो किंवा नागरी जशीच्या तशी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'' तूला काय माहीत ! बाई ग दुनिया फार वाईट निघालीय सध्या''.

'' पण मी तर चांगली आहे ना?''

'' तीच तर घोटाळ्याची बाब आहे.''

'' म्हणजे ? मी नाही समजले.''

'' कसं समजशील बाई. तो दिन्या चकरा मारतोय दारावरून.''

'' मारू द्या की. आपण पाक असलो म्हणजे झालं अन् मला तर एकदाही दिसला नाही हो?''

'' म्हणजे नजर ठेवून आहेस म्हण की!''

अशी चणाक्षपणे बोलण्याची शब्दसिध्दी कोत्तापल्लेंनी मार्मिकपणे मांडली आहे. त्याचप्रमाणे छोटी छोटीच वाक्य घेऊन त्यातून गहण अर्थाची व्याप्ती केली आहे. उपहास, उपरोध आणि क्वचित विनोदाचा शिडकावा यामुळे लेखनाला महत्त्व आलेल आहे.

## ३.२) निवेदनशैली :-

संवादाची भाषा जशी महत्त्वाची असते त्याप्रमाणे निवेदनाच्या भाषेलाही महत्त्व आहे. निवेदन किंवा कथन हे कथेचे एक वैशिष्ट्य आहे. त्यामुळे कथाकार त्या कथा प्रकट करण्यासाठी एक निवेदनपात्र तयार करतो. निवेदक पात्राच्या दृष्टीकोनातून वाचकाला कथा सांगत असतो. वाचकाला व्यक्तीचा परिचय करून देणे, कथानक पुढे

सरकवणे, मार्मिकपणे भाष्य करणे, साध्या सरळ भाषेतून आपला अभिप्राय व्यक्त करणे हे निवेदनातून साधले जाते. अशाप्रकारे कथेतील समग्र भावविश्वाचे सुत्रसंचालन कथाकार हा करत असतो.

कथेला रंगतदारपणा आणण्याचे व एकाचवेळी सरळ त्या विषयाची मांडणी करणे हे निवेदनपद्धतीत महत्त्वपुर्ण ठरते. एखाद्या घटना, प्रसंगाच्या पूर्वी निर्माण कराव्या लागणाऱ्या वातावरणनिर्मितीसाठी निवेदनाची गरज असते.कथेतील घटनेची परिणामकारकता वाढविण्यासाठी किंवा एखाद्या घटनेचा साद, पडसाद व्यक्त करण्यासाठी लेखकाला या घटनेच्या आसपास फिरावे लागते. घटना, प्रसंग, व्यक्ती आणि वातावरण यामध्ये एकसुत्रता आणण्यासाठी सुसंघटीत असा आकृतीबंध तयार करण्यासाठी निवेदनाचा उपयोग होतो.

निवेदन प्रथमपुरूषी. तृतीयपुरूषी, पत्रात्मक, मनोविश्लेषनात्मक इत्यादी पद्धतीचे असते. कोत्तापल्लेंनी आपल्या कुशल निवेदन केले आहे. कधी सरळ साधे निवेदन तर कधी हकिकती - वृतांत कथनाचा आविर्भाव, तर कदी पुराणकथांचा पेहराव यामधून प्रत्यकारी होत असताना दिसते. कोणत्याही कथानकाचे किंवा भाववृत्तीचे निवेदन असो ते अत्यंत समरसतेने करत असताना दिसतात. ते या निवेदनाद्वारे लहान मोठ्या अशा लयबद्ध भाषेंनी निवेदन करतात.

संस्मरणीय व्यक्तिचित्रणे. त्यांचे बहुरंगी मनोदर्शन , सामान्यावर प्रकाश टाकणारी दृष्टी व कथेविषयी त्यांची असणारी निरपेक्ष भूमिका या साऱ्या गोष्टी निवेदनशैलीद्वारे जाणवतात. त्यांची कथा लोकप्रिय झाली आहे याचे कारण त्यांनी अनेक कथांत आत्मपर निवेदनपद्धतीचा (प्रथमपुरषी) वापर जास्त केला आहे. त्यांच्या कथा ह्या वास्तववादी अशा आहेत. मानवी जीवन हे गुंतागुंतीचे आहे हे त्यांच्या साध्या साध्या कृतीतून येत असलेले दिसून येते. आशय बदलला की निवेदन बदलते म्हणजेच निवेदन हे बदलत्या आशयानुरूप त्याला आकार देण्यासाठी ते आलेले असतात. कथावस्तूशी एकरूप होऊन लिहणे, समरसून निवेदन करणे हे निवेदनाचे मुख्य दोन प्रकार म्हणता येतील.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथासंग्रहातील कथात आढळणारे त्यांचे प्रथमपुरूषी आणि द्वितीयपुरूषी निवेदन कशाप्रकारे आले ते पाहू.

## अ) प्रथमपुरूषी निवेदन :

या निवेदनाला आत्मकथनपर निवेदन असेही म्हटले जाते. निवेदक हा 'मी' या सर्वनामाचा उपयोग कथनामध्ये करतो. त्यांच्या 'पाणी' या कथेचे निवेदन प्रथमपुरूषी आहे. कारण या सर्व कथेमध्ये लेखक आपणच वाळवंटात चुकून गेल्यासारखे, तसेच तेथील आलेले सर्व अनुभव, पाण्यासाठी कसे भटकावे लागते, काफिलाबरोबर चाललेले दिडशे लोक याचे चित्रण स्वत: पाहिले आहे असे संबोधून ही पूर्ण कथा लिहली आहे. 'छेद' या कथेचं पूर्ण निवेदन 'मी' वापरून केले आहे. स्वत: कथेचा नायक असल्याचे दाखवले आहे.तिला भेटायला जाण्याच्या उत्सुकतेपोटी तो चर्चकडे जातो तिच्याबरोबर बोलतो. हे सर्व प्रथमपुरूषी निवेदन आहे. 'तर हे असं!' या कथेमध्ये निवेदन यामध्ये मोडते. उदा. '' सकाळी झोपेतून जागा झालो तोच प्रसन्न चित्ताने उठलो. नऊ साडेनऊ होत असावेत. तर अशा प्रसन्न चित्ताने मी फिरायला निघालो तर निर्मला भेटते. केवढा उत्सुक असायचो मी एकेकाळी. ती येणार म्हणजे रस्त्याला येऊन हजार फेऱ्या घालायचो मी. शंभरदा घड्याळात पहायचो,पण आता तिच्या बद्दलची उत्सुकता संपलेली आहे.'' [२८] यामुळे वाटते की निवेदन करणारा लेखक स्वत: तोच आहे तो आपले आत्मनिवेदन करतो आहे.

'कंकालेश्वर' ही कथा प्रथमपुरूषी आहे. यामध्ये सर्वसाक्षी स्वत: लेखक आहे. त्यांनी अनुभवलेले पाहिलेले तेथील चित्रण त्यांनी मांडले आहे. कंकालेश्वरसंबंधी सांगितलेली माहिती खरोखरच तशीच आहे का? यासंबंधी स्वत: प्रयोग केला आहे. 'बाहुल्यासारखा' ही कथा म्हणजे पाहिलेले एक दिवा स्वप्नच वाटते आणि या दिवा स्वप्नातील ती व्यक्ती म्हणजे लेखक. स्वत:च आपल्या जीवनाविषयी पाहिलेली एक कथा वाटते. 'काळोखात उतरून' या कथेमध्ये जीवनात येणाऱ्या अनेक प्रसंगाविषयी, लोकांच्या सुख दु:खाविषयी लोकांना माहिती सांगण्यासारखे म्हणजेच आपण दुसऱ्यांच्यासाठी किंवा स्वत:साठी सुद्धा काही करू शकत नाही यासंदर्भात स्वत:

लेखकांनी 'मी' संबोधून निवेदन केले आहे. 'चक्र' या कथेत 'मी' च्या भोवती सर्व पात्रे फिरताना दिसतात, त्यामुळे मी त्यावेळी काय काय करू शकलो हे मांडले आहे. प्रथमपुरूषी निवेदन वाटत असले तरी ती कथा बापू नावाच्या दुसऱ्या व्यक्तीच्या संदर्भात लिहिली आहे. निवेदन मात्र स्वत: लेखक त्यानी पाहिलेले सर्व जसेच्या तसे आपणच सर्व साक्षी असल्यासारखे मांडले आहे.

लेखकाचे कथेतील निवेदक पात्रांशी व निवेदक पात्राचे त्याच कथेतील इतर पात्रांशी संबंध असतात. प्रत्येक कथेत एक निवेदक असतो त्याच्या दृष्टीकोनातून लेखकाची जीवनदृष्टी व कलाहेतू समजत असतात.

## ब) तृतीयपुरूषी निवेदन :-

या निवेदनाला सर्वसाक्षी निवेदन असेही म्हटले जाते. यामध्ये लेखक स्वत: त्रयस्थाची भूमिका घेऊन तटस्थपणे निवेदन करतो. तो कथेचा निर्माता सुत्रधार असल्याने कथेतील पात्रांना आणि प्रसंगाचा मृत स्वरूप देण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला पात्र प्रसंगापासून अलिप्त राहूनही तटस्थपणे कथेचे कथन करावे लागते ही तटस्थता थोडीजरी ढळली तरी कथानिवेदन अयशस्वी ठरते. या निवेदनात लेखक त्यांच्या नावाने पात्रांचे उल्लेख त्यांच्या नावाने किंवा 'तो', 'ती', 'ते' अशा अशी सर्वनामे वापरून करत असतो.

'काळोख हुंकार' ही कथा तृतीय पुरूषी निवेदनात्मक आहे. यामध्ये वामनबुवा शास्त्री यांच्या जीवना संदर्भात कथा घडली आहे. त्यांच्या कुटुंबाविषयी तसेच त्यांचे समाजातील स्थान याविषयी कथा रंगली आहे. यामध्ये अनेक पात्रे येताना दिसतात. हकिकत वृतांत प्रकारात ही कथा मोडते. 'दसरा उजाडला' या कथेमध्ये सर्व सणात हा सण मोठा कसा, त्याचबरोबर त्या कथेत निवेदन तृतीय पुरूषी आहे. मोरू आणि मोरूचा बाप यांनी केलेला दसरा सण, तसेच त्या सणाचे महत्व हे अप्रत्यक्षरीत्या लेखकानी पटवून दिले आहे. पुराणकथांचा पेहराव या कथेतून जाणवतो.

'वणवा' या कथेमध्ये 'तो' संबोधून निवेदन केले आहे. तेथील स्थळ, प्रसंग यांचे चित्रण, तसेच त्यांच्यासंदर्भात घडलेल्या घटना पहायला मिळतात. कथेचा निवेदक

कोण असावा, त्याचे स्वरूप कोणते असावे याची निश्चिती ही कथाकाराने त्याच्या कलाहेतूनुसार घेतलेला एक निर्णय असतो. कोत्तापल्ले कधी घटना, प्रसंगाचे नाट्यात्मक दर्शन घडवतात तर कधी एखाद्या पात्राच्या जाणिवेच्या पातळीवर जाऊन अनुभव कथन करतो. पात्र, प्रसंगाचे वर्णन वा कथन करतो. 'ओहोळ' या कथेमध्ये सदाशिव आणि वसुधा या नावानिशी त्यांच्यामधील कथन निवेदन करताना दिसतात. वर्णनात्मक निवेदनापेक्षा कथनात्मक निवेदन अधिक आकर्षक असते. असेच प्रसंगाचे किंवा घटनेचे कथन लेखकाने केलेले आहे , त्यामुळे त्यांच्या कथांना गती आलेली दिसते. 'घर' या कथेत 'तो आणि ती' यांचे चित्रण 'चिमणा आणि चिमणी' यांच्या स्वरूपात निवेदन केले आहे. 'दिवा' ही कथा ग्रामीण भागातील पाऊस - पाणी नसल्यामुळे त्यांची झालेली परिस्थिती या संदर्भात लिहिली आहे. ही कथा प्रथमपुरूषी निवेदनात्मक वाटते कारण यामध्ये लेखकाने आपले मत मांडता स्वत: तेथे असल्याचे निवेदन केले आहे.

'कथा : अख्या हिंमतरावाची' ही तृतीय पुरूषी निवेदनात्मक कथा आहे. यामध्ये हिंमतरावांच्या जीवनाबद्दल घडलेली घटना अर्थात त्यांचे जीवन चित्रणच पहायला मिळते. 'कळा ज्या लागल्या जीवा' या कथेमध्ये नायक नायिका सुधा व सतीश आहेत. सुधाला आलेले अकरा दिवसाचे अनुभव चित्रण आहे. या तृतीय पुरूषी निवेदनामध्ये तो सर्वत्र संचार करीत असतो व सर्व पात्रांच्या स्वभावाचे त्यांच्या संभाषणाचे घडलेल्या घटनांचे त्याला ज्ञान असते. पण हा निवेदक मात्र घडलेल्या घटनांच्या बाहेर असतो. 'विदूषक' ही कथा कधीतरी घडून गेली आहे.त्याचे कथन लेखकाने केले आहे. कौंडिव्यधिपती राजा आणि विदूषक यांच्यासंदर्भात कथा घडलेली आहे. 'विनोद' या कथेमध्ये मोहन या नायकाच्या भोवती कथा रिंगण घालताना दिसते. 'इंत्यंभूत' या कथेत भ्रष्टाचारी जीवनाचे चित्रण येते. ही कथा पण तृतीय पुरूषी निवेदनात येते. सर्व कथा वाचकाला अंतर्मुख करून टाकतात. कारण बऱ्याच कथांमधून कोत्तापल्ले स्वत:ची मते ठाम विश्वासाने आपल्या निवेदकाच्या माध्यमातून मांडताना दिसतात.

'कोर्टाचा हँग ओव्हर' यामध्ये कोर्ट आणि त्यांच्याबरोबर येणारी त्यांची पत्नी काही मित्र यांचे निवेदन येते. हे तृतीय पुरूषी निवेदन आहे. 'हकीकत : वास्तवातली', 'पुरूष', 'फसवणूक', 'पाठलाग', 'चक्र', 'राखण', 'मया' या सर्व कथांतून तृतीय पुरूषी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY

निवेदन आलेले आहे. कथार्थानुसार विविध छटा निवेदनात उतरत असतात. याप्रमाणे कथेतील एक पात्र असते किंवा त्याच्याभोवती कथा फिरत असेल, मात्र ते 'स्व'ला धरून असेल तर प्रथमपुरूषी निवेदन होते. तृतीय पुरूषी निवेदन यामध्ये कथेबाहेरील एक पात्र असते त्यामध्ये लेखक स्वत: डोकावत नाही. आपले विचार मात्र त्या व्यक्तीच्या तोंडून काढतो. प्रत्येक कथेत मात्र एक निवेदक असतो.

## ३) संवादलेखन :

कथालेखनात संवादाला महत्त्व आहे. आणि त्यामध्ये ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण माणसांचे संवाद जसेच्या तसे त्यांच्या बोली भाषत मांडले तर त्या संवादाला वेगळेच महत्व येते. मुख्य म्हणजे संवादलेखनातूनच पात्रांचा स्वभाव कळून येतो. पात्रांच्या मनात नेमके काय चालले आहे हे जाणवते. संवाद म्हणजे कथेचं प्राणभूत तत्त्व म्हणून त्याकडे पाहिले जाते. कथेमध्ये सजिवता आणण्याचे कार्य संवाद करत असते. कथा कादंबरीमध्ये प्रसंग किंवा घटनानुसारच संवाद होत असतात, त्यामुळे संवादातही फरक होत असताना दिसून येतो. कथासंग्रहातील व्यक्तींचे अंतरंग समजण्यासाठी त्या व्यक्तींच्या मनोगताचे निवेदन करण्यासाठी लेखन संवादाचा उपयोग करतात. पात्रांचे चरित्र चित्रण करण्यासाठी कथानकाला आणि कथागत घटकांना गतीशील करण्यासाठीही संवाद हे कथेला पुरक आहेत. त्यामुळे कथानकाची परिणामकारकता वाढत असते.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथांमधून ग्रामीण अस्सल बोलीभाषेतील संवाद हे जास्तप्रमाणात आढळतात. त्यामुळे वाचक कथा वाचण्यास उत्सुक असतात. पात्रांचे अंतरंग समजण्याच्या दृष्टीने तसेच कथेत गतीमानता येण्याच्या दृष्टीने , वातावरणाच्या दृष्टीने कथेत संवादाला अतिशय महत्व आहे. संवादातून घटीत घटना व पात्रांच्या क्रिया प्रतिक्रिया समजू शकतात. कोत्तपल्लेंच्या कथेतील संवाद हे प्रचारकी थाटाचे असे नाहीत पण विविध प्रसंग घेऊन व्यक्तींच्या मनाची होणारी उलघाल, अस्वस्थता व्यक्त करण्यासाठी त्यांचा उपयोग केला आहे. त्यांच्या कथेतील संवाद हे कधी स्वप्नरंजनात्मक स्वरूपाचे तर कधी उपहासात्मक संवाद आहेत. तर कधी सामाजिक, घरगुती, राजकीय अशा

वेगवेगळ्या प्रकारात संवाद मांडले आहेत हिच शैली त्यांच्या लेखनामधून दिसते.

कथेतील पात्रे जशी आहेत तसतसेच त्यांच्या शब्दांत, त्यांच्या वर्तनानुसार, राहणीमानानुसार भाषा मांडली आहे. ग्रामीण, अडाणी व्यक्तींची भाषा त्यांच्या बोलीभाषेतच मांडली आहे, तर सुशिक्षित नागरी लोकांची भाषा त्यांच्या नागरी भाषेतच मांडली आहे. त्यामुळे त्यांनी मांडलेल्या संवादाला एक लय असल्याचे वाटते.

राजकारणी, भ्रष्टाचारी लोकांच्यामधून झालेले संवाद त्यांच्या काही कथांतून दिसतात-

‘‘बोला मोहनराव. काय घेणार?’’

‘‘म्हणजे?’’ गांगरून तो कसाबसा बोलला तर शिवाजीराव प्रचंड गडगडाटासारखे हसू लागले.

‘‘म्हणजे ? ... अहो व्हिस्की, ब्रांडी, जीन,.. काय घेणार?’’

‘‘छे छे. मी काहीच घेत नसतो. कधीच घेतली नाही मी’’ कसाबसा तो बोलला.

‘‘असं कसं बरं? अरे तुम्ही पत्रकार. घेतली पाहिजे.’’ [२९]

‘‘कुछ फिक्रकी बात नही साहब.’’

‘‘नाही. ती काळजी नाही तुम्ही असल्यावर... पण...’’

‘‘अरे बिल्कूल फिक्र करना नहीं जी. हमने सब साक्षीदारको मनाया है । वो कहेंगे की हमारे सामने ये सील हुआही नही... मामला खतम्... आप बिल्कूल फिक्र मत करो.’’ [३०]

असाच इनस्पेक्टर देशमुख यांचा फोनवरील संवाद -‘‘तुला माहीत नाही का आम्ही येथे शिरसाळकरला पकडला आहे ? हो होय शिरसाळकरच. पळतो कुठे आल्या तावडीतून भैंचोद. सरकार म्हणतं पोलीस खातं हलगर्जी आहे. हलगर्जी कसं?

पकडला की नाही बदमाशाला - हॅलो, अजून तो कबूल करत नाही. ठीक आहे. आज नाही उद्या कबुल करील. आपण तर मागेच जाहीर केले आहे ना ? आता कटकटी करू नकोस, येस हाच शिरसाळकर आहे. आता खरा शिरसाळकर मिळाला तरी उपयोग नाही ...''[३१]

कौटुंबिक संवाद त्यामधील पती पत्नींच्यामधील होणारे संवाद अतिशय मार्मिकपणे मांडले आहेत.

१) ''घर बांधताहेत तर बांधू देत बिचाऱ्यांना.''

''तुम्हाला काय होतंय. सगळा कर मला काढावा लागतो.''[३२]

२) ''वसु''

'अं' अंह माझी अवस्था बघ नारे.'

'मी काय म्हणतोय? मी काय राक्षस आहे का ग?'

'अंहं रे तुझा तसाच स्वर निघाला. आणि बघ ना रे कसं फिरतंय बाळ पोटात. बघ ना डावीकडे हात ठेव ना.''[३३]

३) ''सुधा...''

सुधा आपली गप्पच मग सतीश आपल्या खास मुडमध्ये म्हणाला.

'आता धपाटा हाणीन हं पाठीत. काय झालं ते ऐकून घ्यायचं नाही... मग तिनं रागवूनच तोंड फिरवलं. त्यांन सगळी हकिकत सांगितली तेंव्हा कुठं तिला बर वाटलं.

मग सतीश म्हणाला, 'काय वाटलं ग मी आलो नाही काल तर?'

ती रागातच म्हणाली, 'काय वाटायचं?'

'नाही... संशय वगैरे

'मूर्ख आहेस झालं ''[३४]

४) 'काय झालंय महाराजाना ?'

' राणीसरकार, कंटाळलोय आम्ही या दैनंदिन कटकटींना'

' झालय तरी काय महाराज ? आणि कंटाळून तरी कसं चालेल? ' '' [३५]

५) '' जास्त बोलू नकोस, माझ्या अध:पतनाला तूच कारण आहेस.''

कवीचीच बायको ती. तीही बाणेदारपणे म्हणाली, '' कोणीच कोणाच्या अध:पतनाला जबाबदार असत नाही. प्रत्येकजण आपापल्या अध:पतनाला आपणच जबाबदार असतो हे सोयिस्करपणे विसरतो. एवढेच.'' [३६]

६) कसला विचार करताय?''

'' छे छे. कसलाच नाही. आपला... आपला तुझाच विचार करतोय.''

'' खोटं.''

'' आता काय खोटं?'' [३७]

७) '' तुला काय माहीत ! बाई ग दुनिया फार वाईट निघालीय सध्या.''

'' पण मी तर चांगली आहे ना?''

'' तीच तर घोटाळ्याची बाब आहे.''

'' म्हणजे ? मी नाही समजले.''

'' कसं समजशील बाई. तो दिन्या चकरा मारतोय दारावरून.''

'' मारू द्या की. आपण पाक असलो म्हणजे झालं अन् मला तर एकदाही दिसला नाही हो?''

''... म्हणजे नजर ठेवून आहेस म्हण की!'' [३८]

कधी कधी पती - पत्नींच्या भांडणाच्यावेळेचे तर कधी प्रेमाने बोललेले अशा

वेगवेगळ्या प्रकारात संवाद दिसतात. असेच मुले व आई - वडील यांच्यात होणारे संवाद

१) 'आई डॉक्टरला बोलावू का?'

'नको रे'

'रंगा'

'काय आई'

'आज तुला एखादी बहीण असती तर किती बरं झालं असतं नाहीरे'' [३९]

२) 'आई, जातो आज ऑफिसला' आईनं त्याच्या कपाळावर बोटं मोडली. जा बाळ, किती दिवस पडून राहणार. अरे, पोट आहे ना बाबा. ते नसतं तर जन्मभर दु:ख करायला आपण मोकळे होतो.'' [४४]

३) ''बाबा कुठली सांगू हं ?''

''कुठली ही सांग हां.'

''मला पुष्कळ येतात. राक्षसाच्या, अस्वलाच्या, वाघसिंहाच्या, कावळ्या चिमण्यांच्यासुध्दा.''

''मला आपली चिमणीचीच सांग बुवा.'' [४१]

४) ''बाबा मला कपडे घेणार का?''

'ऐक रे, दसरा सण मोठा. बघ केवढी गर्दी ही. हजारो माणसं सोनं लुटायला चाललीत पूर्वी पाटलांच्या शेतातलं सोनं लुटायचे पण काही दिवसापासूनच त्यान बंदी केली आहे. आता सर्व शमीचा पाला विकत मिळतो तो घ्यायचा'' [४२]

याप्रमाणे ज्या त्या वयातील मुलांच्याबरोबर त्यांना समजतील असे संवाद कोत्तापल्लेंनी व्यवस्थितरित्या मांडले आहेत. असेच रस्त्याने जाताना किंवा काही कामानिमित्त अनोळखी व्यक्तीशी होणारे संवाद अस्सलपणे मांडले आहेत.

१) '' ये जवान आदमी. तू मोठा धट्टाकट्टा आहेस. माझं एक काम करशील?''

'' सांगा तर खरं!''

'' नाही आधी होकार दे.''

'' असं कसं ? होण्यासारखं असेल तर करीन''

'' तूझ्यानंच होईल रे बाबा. म्हणून तर आलो तुझ्याकडं'' ४३

५) ' हमारे बादशाहे अलमगीर पिछे है. जाओ. पाणी जरूर मिलेगा आपको' उंट फेस गाळत उभे होते. मी सर्व उंट पार करून मागे आलो.

बादशाहे अलमगीरनी विचारंलं.

'काय हवंय बाळ?'

' इथून बाहेर जायचंय आणि प्रथम पाणी हवंय'

' हे बघ आमच्या टोळीत सामील होशील का? ही एक लुटारूंची टोळी आहे.'' ४४

पाऊस पाणी नसल्यामुळे लोक त्या चिंतेत होते त्यावेळी त्यांच्यामध्ये चाललेले संवाद समाजात असे सतत होत असतात आणि नेमके हे हेरून कोत्तापल्लेनी जसेच्या जसे त्यांच्या भाषेत मांडले आहेत.

'' मग काय करावं मन्तीस इदूबा?''

'' काय करायचं मालक? आज आनीशाच आमुशाबी हाय. त्याला देवीच्या देवळात नेऊन आंगात आनांयचं.''

'' अर पर आसं बळजबरीनं अंगात कसं येईल?''

'' येतंया. आज चाळीस वर्साआदी आसंच झालं होतं. मी तवा नेटकाच आऊतकरी झालो होतो. आसंच आपल्या गावातून ढग यायचे आन जायचे. पंडरीच्या

बापाला देवीच्या देवळात न्हेल. आन आलं की अंगात. आन मंग सांगितला की देवीन कोप.'' [४५]

कथा ह्या संवादाचा उपयोग न करता कथनानात्मक अशा स्वरूपात लिहिल्या जातात. पण संवाद जर जसेच्या तसे कथेमध्ये त्या अस्सल शब्दात मांडले तर त्या कथेला एक वेगळीच मोड येते. काही कथांतून ग्रामीण भागातील लोकांचे संवाद आले आहेत तर काही कथांतून पती - पत्नींचे संवाद आलेत. त्यामुळे त्या कथा उत्कृष्ट वाटतात. वाचकही त्या कथेकडे आकर्षित होतो.

## ३.४) अनुभवविश्व आणि समाजदर्शन :-

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे लेखक जेंव्हा साहित्य निर्मिती करत असतो त्यावेळी त्या त्या कालखंडाचे दर्शन होत असते. समाजात व्यक्तींच्या सानिध्यात आपण राहत असतो , त्यामुळे आपल्याला अनेक अनुभव येत असतात. हेच येणारे अनुभव साहित्यकार साहित्यामध्ये मांडत असतात. ग्रामीण साहित्यात असे अनुभव अस्सलपणे पहायला मिळतात. यामध्ये त्यांचे दु:ख, दारिद्य, जीवनपध्दती तेथील सण - समारंभ याचे वर्णन येते. एकंदर साहित्यामध्ये राजकारण, रूढी, परंपरा इत्यादीचे चित्रण येते.

कोणताही लेखक जरी कलात्मक निर्मिती करत असला तरी त्या कलात्मक निर्मितीमध्ये त्यांच्या जीनानुभवांना अत्यंत महत्वाचे स्थान असते. त्यानी जे अनुभवले तेच त्यानी लिहले. सभोवतालचे वातावरण, संस्कार यातून लेखकाची लेखणी घडत असते. त्यातूनच त्यांचे अनुभवविश्व साकारताना दिसून येते. जीवनातील एखादे नाट्य पकडून त्याला कलेमध्ये बद्ध करण्याचे सामर्थ्य लेखकाजवळ असते. त्यादृष्टीने लेखक आपल्या साहित्यातून 'जीवनदर्शन' घडवित असतो. प्रत्येकाचे जीवनाकडे पाहण्याचे दृष्टीकोण ठरलेले असतात. तात्त्विक मुल्यांचाही पुरस्कार लेखक आपल्या कलाकृतीतून करत असतात. या सर्व व्यवहारातून लेखक आपले अनुभवविश्व व जीवनाविषयक नैतीक मुल्ये यांचा पुरस्कार साकार करत असतो. यातूनच त्यांचे अनुभवविश्व आकाराला येत असते.

नागनाथ कोत्तापल्लेंनी अस्सल ग्रामीण जीवन तर काही कथांतून नागरी जीवन चित्रण केले आहे. त्याचबरोबर महत्वाचे म्हणजे त्यांच्या कथांतून समाजजीवनाचे चित्रण प्रामुख्याने दिसते. समाजातील घडणाऱ्या वेगवेगळया घटनांच्याद्वारे त्यांनी कथानिर्मिती केली आहे. अनेक विषय त्यांनी कथांमध्ये घेतले आहेत. समाजामधील व्यक्ती म्हणजेच कीर्तनकार, राजा, विदूषक, कोर्ट, शेतकरी लाहन मुले तसेच इतर जातीय व्यक्तींचे चित्रण येते. याबरोबरच धार्मिक सण-समारंभ, दवाखाण्यातील चित्रण, औरंगाबादच्या लेण्याच्या पायथ्याविषयी, निसर्ग असे आलेल्या वेगवेगळया अनुभवांचे चित्रण त्यांनी कथामधून मांडले आहे. सभोवतालच्या समाजाचे सूक्ष्म अवलोकन त्यातील वर्तमान व भावी अंत:प्रवाहांची दिशा व्यक्त करून समाजाचे चित्र ते रंगवत असतात.

कोणतीही गोष्ट असो तिला वेळेपूर्वी तितके महत्व नसतेच, पण जर तशी वेळ आली तर मग त्या गोष्टीची गरज भासते. अशीच 'चक्र' ही कथा आहे. म्हणजेच कोणतीही व्यक्ती अनुभवातून शिकत असते आणि असे आलेले काही अनुभव समाजाच्या हिताचे असतात. ''तात्या, काय बी म्हण गड्या तू. आपल्या गावी शेड बांधली पाहिजे बघ पुण्यासारखी . पाऊस असो, वारा असो, काय भीती न्हायी. माणूस मेलं की जाळ. माणूस मेलं की जाळ ... कायी अडचण येणार न्हायी.'' ४६ जो पर्यंत पाऊस नव्हता तोपर्यंत शेड बांधायची गरज वाटली नाही पण वरून धो.. धो पाऊस पडतो त्यावेळी प्रेत कसे जाळायचे हा प्रश्न पडतो, त्यावेळी शेडचा विषय निघतो हाच एक यापैकी अनुभव दिसतो. तसेच याच कथेत समाजाचे दर्शन घडते ते असे की, जातवाले आपल्या जातीतील लोकांच्याकडे लक्ष देतात. आता सुरेशच्या जातीतील कोणी नसल्याने त्याचा दादा मरतो त्यावेळी कोणी येत नाही. स्त्रिया पहायला येतात पण उपयोग नसतो. हे तेथील जातीविषयी. याच गावातील पाटलोबा तात्या हा एक समाजसेवक म्हटलं तरी चालेल कारण त्याच्यामुळे गावात मॅट्रीकपर्यंत शाळा होती, गावात लाईट येते, अडीअडचणींच्या कामाला येतो आणि हाच या अंतविधीच्या कार्याला धावून येतो. अशा काही व्यक्ती समाजात दिसून येतात.

'विदूषक' कथेमधील विदूषक सतत राजाला विनोद सांगून हसवत असतो. हा सतत हसत असलेलाच राजाने पाहिला आहे पण एकदिवस राजा दु:खाचा प्रत्यय

येणारी गोष्ट विदूषकाला सांगायला लावतो. विदूषक चार गोष्टी सांगतो पण त्यातून दु:खाचा प्रत्यय येत नाही. शेवटी तो स्वत:च्या आयुष्यात झालेल्या घडामोडीत आलेले दु:खाचे प्रसंग याचे चित्रण करतो. परंतु राजा हे दु:ख मानत नाही. कारण विदुषकाला सतत हसलेला पाहिलाय, त्यामुळे तो इतका दु:खी असेल असे राजाला वाटत नाही कारण अनुभवातून मनुष्य तर्क लढवत असतो.

'विनोद' कथेमध्ये असाच मोहनने घेतलेला अनुभव. मोहननेजर शिवाजीरावांच्याकडे नोकरी स्वीकारली नसती आणि जर त्यांच्याविरूद्ध बातमी पेपरमधून देत असती तर त्याला संपवायला त्यांना वेळ लागला नसता. मोहन मात्र त्यांच्यामध्येच थांबून थोड्याच वेळात त्यांच्यासारखेच व्यवहार शिकतो, त्यांच्यासारखे चोरटे धंदे,स्त्रियांच्यावर अत्याचार वगैरे करण्यापेक्षा आणि त्यांच्या बातम्या आहेत तशा सत्य घटनेवर न देता गप्प बसण्यापेक्षा शिक्षणाचा काहीतरी उपयोग व्हावा म्हणून मंडळाच्या कॉलेजमध्ये घ्या असा नेम मारतो. यामध्ये समाजदर्शन दिसते ते असे की, गरीब कितीही जिव तोडून सत्य सांगायला लागला तरी खरं समजलं जात नाही. कारण डी.एस्.पी. सारखे लोकसुध्दा पैसे टाकले की खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करून टाकतात हे दिसते. 'इत्यं भूत' मध्ये पाटील या व्यक्तीला शिरसाळकर समजून आणतात . त्याला खूप त्रास देतात. तरीपण तो खरे तेच बोलतो पण देशमुख मानत नाही. देशमुखाने जर शिरसाळकरांना पकडून आणले नसते तर तो सस्पेंड झाला असतां त्यामुळे स्वत:च्या स्वार्थापोटी दुसऱ्याचा बळी घेणारे लोक समाजात दिसतात ते याप्रमाणे.

'कोर्टाचा हँग ओव्हर' या कथेमध्येसुध्दा कोर्ट यांच्याकडे त्यांचा मित्र एक केस घेऊन येतोय. काही वकील कोर्टात मित्रमंडळी, नातेवाईक, पैसेवाले लोक याकडे लक्ष देतात. पैसे मिळाले तर बातमी फिरायला वेळ लागत नाही आणि पैसे घेऊन साक्षीदार व्हायला लोकसुद्धा तयार होतात अशीच घटना येथे दिसून येते. असे समाजातील अनुभव प्रकट केले आहेत. 'हकीकत: वास्तवातली' या कथेत समाजजीवनाचे चित्रण येते. समाजात अशा काही व्यक्ती असतात की त्या दुसऱ्याला स्वत:मध्ये आत्मविश्वास आहे काय पाहण्यासाठी लोकांना प्रभावीत करतात. अशीच एक व्यक्ती राघवला आकर्षित करून घेते, त्यात तो आजारी पडतो. पण हे डिसुझाला माहीत असते, त्यामुळे तो हे

सांगतो आणि झटकण रघू उठून बसतो. कोणीही अनुभवातून शहाणा होतो. 'फसवणूक' या कथेमध्ये कथानायक सारखा आत्महत्या करण्याविषयी विचार करतो. मात्र आत्महत्या करण्याचे धैर्य त्याच्यात नाहीच. कोणतीही गोष्ट अनुभवल्याशिवाय त्यातील महत्व समजत नाही. त्याला सतत वाटायचे मोठ्यानं हसणारी माणसं मनानं सरळ असतात. पण तसे कधी अनुभवाला येत नाही. पण जेंव्हा त्याचे साहेब विचारतात नोकरीवरून काढल्यानंतर काय करशील म्हणून त्यावेळी मात्र तो मोठ्याने हसतो आणि आत्मविश्वासाने म्हणतो आत्महत्या करीन. त्याचवेळी त्याला मोठ्यानं हसणारी व्यक्ती कशी असते याचा अर्थ लागतो. 'दिवा' कथेमधील तेथील समाजदर्शन दिसते. तेथील लोक अंधश्रद्धेवर खूप विश्वास ठेवतात. पाऊस पडावा यासाठी मुसळाला बेडकुळ्या बांधतात, महादेव पाण्यात बुडून ठेवतात. सर्व बायका नांगर घेऊन नागोळं रानात फिरतात. पाण्याविना लोकांना काळजी पडली आहे. देवाकडे याचना करतात. जनावराना मारू नको म्हणून पण देव थोडेच ऐकणार. तेंव्हा पंढरीच्या अंगात देवीला आणायला सांगतात त्यावेळी तो दिवा लावायला सांगतो असे समाजात घडणारे चित्रण कोत्तापल्लेंनी मांडले आहे.

'काळोखात उतरून' यामध्ये समाजाचे चित्रण आलेले आहे. समाजातील तळागाळातील लोकापासून उच्चवर्गीय लोकापर्यंतचे वर्णन आले आहे. समाजात जे काही घडते ते मांडले आहे. बिल्डींगा चढताहेत, मोटारी, रिक्षा, टांगे वेळेनुसार चालतात त्याचबरोबर गावचे वर्णन, गावातील गल्लीचे म्हणजेच गल्ली कशी ओळखावी जेथे कुत्री भुंकतात तेथेच माणसे असतात. तरूण मुले कशातरी आवाजात गात हिंडतात असे समाजातील वर्णन लेखकाने केले आहे. समाजात असे काही लोक असतात की सांगकाम्याप्रमाणे लोक काय सांगतात त्यावर विश्वास ठेवतात. त्यात एकुलता एक मुलगा घरात असेल तर तो लाडातच वाढलला, त्यामुळे त्याला कोणीच काही बोलत नाही. किंवा काही कामही सांगितले जात नाही. अशाच एका धोंडिबा पनघटचे चित्रण कोत्तापल्लेंनी 'राखण' या कथेत केले आहे. या कथेत समाजदर्शन येते ते असे की, लहान मुले नावावरून कशी चिडवतात, नवीन लग्न झाल्यानंतर शेजारी पाजाऱ्यांनी केलेली स्तुती, बायकोला ताब्यात ठेवण्यासाठी मित्र देत असलेला सल्ला, उपदेश, त्या त्या वयाच्या सुनांची थट्टा, खयाली - खुशाली विचारणारे माहेरकडील लोकांचे चित्रण येते.

त्याचबरोबर सत्यनारायण पुजा, मृगाच्या दुसऱ्या दिवशी शेतातल्या आंब्याखाली असणाऱ्या पांडवांची व इतर देवांची केली जाणारी पुजा यांचे वर्णन येते.

'मया' या कथेत हरबाचा व्यवसाय डालग्या तयार करण्याचा व त्याचे राहणीमान याचे चित्रण येते. पाहुणचार हा ही यामध्ये तितकाच महत्वाचा आहे. पंढरी हा घरी पाहुणे आलेत यासाठी डुकराची पिले घेऊन जाण्यासाठी आला आहे. घरी पैशाची अडचण आलेला हारबा पिले विकायला काढतो पण डोळ्यांसमोर डुकराच्या आक्रोशाचे चित्र पहावत नाही, त्यामुळे पिले विकायचा निर्णय बदलतो अशा व्यक्ती समाजात दिसतात. 'काळोख हुंकार' या कथेमध्ये थोडे सामाजाचे दर्शन येते ते म्हणजे कीर्तन ऐकायला येणारा उत्सुक समाज, एखादी गोष्ट समजली तर तिचा होणारा गाजावाजा, तसेच केल्या जाणाऱ्या करण्या म्हणजेच चेटकी, भानामतीचे प्रकार दिसून येतात. यावरून चाललेली भांडणे हेच वामणशास्त्री बुवा यांच्या आईच्या संदर्भात कथेत येतांना दिसते.

'दसरा उजाडला' या कथेत समाजाचे दर्शन येते ते असे की लोक कितीही उत्सुकतेने सण - समारंभ साजरे करतात. दररोज स्वच्छ राहणार नाहीत पण सणाच्या वेळी मात्र अंघोळ करणे, दात घासणे, पुजा करणे हे प्रकार दिसतात, ते कथेत आले आहेत. दसरा या सणाला तर शमीचा पाला सोनं म्हणून द्यायचे आणि पाया पडायचं. कोणतंही नवीन कार्य असो त्यादिवशी शुभ मुहूर्त म्हणून सुरूवात केली जाते. त्याचबरोबर महत्वाचे म्हणजे या दिवशी गरीबार्नं मदत करणे, भिकाऱ्यानां पैसे टाकणे असे प्रकार पहायला मिळतात, हेच समाजातील चित्रण नागनाथ कोत्तापल्लेंनी कथांतून मांडले आहेत. समाजातील विविध अंगाचा अभ्यास केल्यामुळे त्यात विविध घटना म्हणजे रूढी, प्रथा, लोकसमजुती, विधी यांचा अविष्कार कथेत आला आहे.

## ३.५) कथावस्तू :

कथावाङ्:मय पाहिले तर दिसून येते की, कथेचे असंख्य विषय आहेत. जीवनातील कोणत्याही घटनामधून कथेची कथावस्तू उचलता येते. जीवनातील असंख्य संघर्षातून, प्रसंगातून नेमके कथाबीज शोधून प्रतिभावंत लेखक कथानिर्मिती करीत असतो. कथवस्तूचा खरा आधार घटना - प्रसंग आणि पात्रांचे स्वभावदर्शन याच्यांत

असते. प्रसंग आणि स्वभाव एकजीव झालेला असतो. अर्थात संवाद, व्यक्तिचित्रण, निसर्गचित्रण, स्थलकाल, वातावरणनिर्मिती इत्यादी गोष्टी महत्वाच्या असतात. वास्तविक पाहता मानवी जीवनाचा मानवी मनाचा शोध असतो. अशा कथावस्तूला योग्य रूप देऊन ती कथावस्तू यशस्वी करणे अवघड काम असते. त्यासाठी कथामांडणीचा विचार करता एखाद्या विषयाची निवड केली म्हणजे काय सांगायच आणि कसे सांगायचे हे दोन टप्पे गृहीत धरून त्याची परिणामकारक अशी कलात्मक अभिव्यक्ती करण्याचे चातुर्य म्हणजे यशस्वी तंत्र होय.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथासंग्रहातील कथांच्या कथावस्तूचा विचार करता बहुतांश कथांच्या कथावस्तू निसर्ग, प्रेम - भूक या विषयावरील आहेत. इतकेच नव्हे तर कोत्तापल्लेंच्या सर्वच कथातील कथावस्तूंना वास्तवाचा आधार आहे. वास्तवाच्या दृढ पायावर या कथावस्तू आधारीत ओत. समाजजीवनात घडणाऱ्या सर्वसामान्य वाचकांच्या दैनंदीन जीवनात प्रत्ययाला येणाऱ्या त्यांच्या कथावस्तु आहेत. व्यक्तीव्यक्ती मधील संघर्ष, व्यक्ती - प्रसंगातील संघर्ष, मना - मनातील संघर्ष असा संघर्ष टिपून काढला आहे. कथेचा प्रारंभ आणि शेवट वेधक आणि काळजीपूर्वक दक्षतेने घेतलेला आहे. या कथासंग्रहातील कथांची कथावस्तू पाहत असताना त्यामधील व्यक्तिरेखानांही तितकेच महत्व आहे कारण व्यक्तींच्या भोवतीच कथा फिरलेल्या आहेत. त्यामुळे कथेतील नेमक्या घटना प्रसंगाइतकेच व्यक्तीची गरज आहे. कथावस्तू मांडत असताना तितक्याच प्रखरतेने व्यक्ती येताना दिसतात.

'काळोख हुकांर' शास्त्रीबुवा लहानपणापासून कीर्तन करायचे पण त्यांचे घराने कीर्तनकारीचे असे नाही. एकदा शास्त्रीबुवांच्या काकुने सांगितले होते की, 'बापाला मारण्यात आईचा वाटा आहे' याचा अर्थ लावण्यासाठी तो सतत विचार करत रहायचा. यातूनच तो शास्त्रीबुवा झाला. एकदा त्यांच्या आईच्या पेटीत सुया, लिंबू, बाहुल्या असे काहीबाही त्यांना दिसले. त्यामुळे यांच्या काका - काकुचा समज की याचकारणाने आपले मूल राहत नाही म्हणून काकु तळतळाट करते. शास्त्रीबुवा त्यामुळे कधी सुखीच नाहीत. त्यांना चार - पाच मुली आहेत. एक दिवस मालनच समजून शास्त्रीबुवा स्वत:चीच मुलगी नलिनीचा हात पकडतात, त्यामुळे आजारी असलेली पत्नी



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तीपण मरते. नलिनी यामुळे वेड्यासारखी करते म्हणून शास्त्रीबुवा गारूड्याकडून नागाचं पिल्लू आणतात आणि नलीनीच्या उशाला ठेवतात त्यात नलिनी मरते. 'लोकासांगे ब्रम्हज्ञान आपण कोरडे पाषाण' याप्रमाणे दुसऱ्यांना कीर्तन सांगणारे शास्त्रीबुवा स्वत:ची पत्नी आजारी होती त्यावेळी रस्ता झाडणाऱ्या एका बाईला त्यांनी ठेवले होते. नलिनीपेक्षा तीन-चार वर्षाने मोठी असलेल्या मालनविषयी त्यांची पत्नी सुचवते त्यामुळे तीच त्यांना घरभर दिसू लागते. इकडे त्यांच्या दोन मुली शास्त्रीबुवांच्या वर्तनाला घाबरून पळून जाण्याचा विचार करतात. त्यावेळी त्यांची मुलगी त्यांना स्पष्ट सांगते. 'नलिनी गेली तशी मी मरणार नाही लक्षात ठेवा'' ४७ एकंदर सर्वच मुली त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत.

शास्त्रीबुवांचे कीर्तन गावातील लोक ऐकायचे पण घरात त्याना मानच नव्हता. त्यानी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा म्हणजे त्यांच्या समोर दिसणारा काळनाग. त्यांच्यासमोर काकु असल्याचा भास होतोतिचा तळतळाट जमिनीवरती घासलेल्या हाताची आठवण येते आणि आणि आपला संसार उद्ध्वस्त होण्यचे कारण हेच असावे असे त्याना वाटते अन् त्यातच त्यांचा शेवट होणार असे दिसते.

'दात' या कथेचा कथानायक रंगा अविवाहीत आहे. घरात एक आई पण तरीही दोघांच्या पोटापाण्याचा खर्चाइतके कमविणे त्याला शक्य नाही. खूप भटकतोय पण नोकरी नाही. आई आजारी तिला औषधपाणी आणू शकत नाही. घर म्हणून एखाद्याला बोलवावं तर घराला घरपण नाही करण परिस्थितीपुढे लोक काहीही करू शकतात. रंगाची आईसुद्धा पैशासाठी आजारी असुनसूद्धा वेळेचा विचार न करता हसत त्यांचं स्वागत करते. रंगाला म्हणते. 'आज तुला एखादी बहीण असती तर किती बरं झालं असतं नाही रे' ४८ त्याचबरोबर लग्न करायला सांगते. पोटासाठी लोक कोणत्याही थराला जातात हे यातून दिसते.

'पाणी' या कथेतील कथानायक अचानक वाळवंटात आला आहे. कसा आला हे त्याला माहीत नाही. त्याला परत जायचे म्हणजे कोठून कसे जायचे हे समजत नाही. जिकडे तिकडे वाळूच वाळू पाणी मात्र कोठेच नाही. फिरून फिरून तो थकलेला आहे पण पाणी मिळत नाही अशाच वाळवंटातून उंटाचे काफिले घेऊन व्यापारी व्यापार

करतात असे त्याला माहीत असते, पण तेही त्याला लवकर दिसत नाही. दु:खी जीवनात जसा प्रेमाचा आधार तसे वाळवंटात ओयॅसिस.

कथानकाला कोठूनतरी उंट आल्याचे दिसते. आता पाणी मिळणार या उत्सुकतेने आलेल्या त्या दिडशे सांडणीस्वार यांच्याकडे जातो. त्यामध्ये महत्वाचे म्हणजे एकही स्त्री नसते. तो पाणी मागतो पण ते त्याबदल्यात आपल्या लुटारूंच्या टोळीत सामील व्हायला सांगतात पण खूप गयावया केल्यानंतर जखड म्हातारा उंटाच्या पोटातील पाण्याची पिशवी काढून द्यायला सांगतात. शेवटी कथानकातून दिसते की, प्रत्येकजण स्वत:चा स्वार्थ पाहत असतो आणि या स्वार्थाभोवतीच जग गुरफटलेले आहे. प्रत्येकजन कमवतोय ते फक्त स्वार्थापोटीच.

'छेद' मध्ये नायकाला भेटलेले वेगवेगळे मित्रमैत्रिणी यांचे वर्णन येते. स्वत: उदास असल्याने दुसऱ्याचे बोलणे त्याला कंटाळवाणे वाटते.नागराजानं बोलतो ते व्यख्यान सारखचं वाटतं त्यामुळे त्याला एखादा प्रश्न विचारून त्याला गुंतवून टाकायचे. पुष्पा पाटील ही कविता करते पण भेटली तर बालपणापासून आतापर्यंतचा पूर्ण वृत्तांत सांगत असते त्यामुळे त्याना कसे गठवायचे हे त्याला चांगलेच समजते. पण याला बोलायला आवडतं ते ख्रिश्चन धर्मोपदेशीका बरोबरच. तिलासुद्धा त्याच्याबरोबर बोलायला आवडते त्यामुळे ती भेटते. तिला विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर परमेश्वरवरच असते. तो तिला विचारतो तुम्ही हा पेशा का पत्करला? परमेश्वर कोठे असतो? देवळाचा उंच कळस कशासाठी? तिची उत्तरे असतात, येशुने सांगितले म्हणून. दुसऱ्या उत्तरावेळी ती वर पाहते म्हणजे ज्याने विश्व निर्माण केल, तो वरती आहे तर तिसऱ्याचे उत्तर असते शांततेसाठी, परमेश्वरासाठी, लोकांसांठी त्यानेच या कथानायकाला आपल्याकडे पाठवले म्हणून तो आला, अशी भावना तिच्या मनात आहे. व्यक्ती तशा प्रकृती प्रमाणे वेगवेगळ्या व्यक्ती समाजात दिसतात.

'तर हे असं!' या कथेतील नायकाला जीवन म्हणजे काय? सकाळ, संध्याकाळ, दुपार येते आणि जाते त्यामुळे त्याला त्याच्यात रस वाटत नाही. कोणत्याही कामात त्याचे लक्ष नाही. कामावर जाणे, प्रेयसीला भेट, मित्रातून रमणे याचे महत्त्वाचे त्याला वाटत नाही. त्याचा मित्र मेला त्यावेळी पहायला जातो पण मित्राबरोबरच्या सर्व

आठवणी डोळ्यांसमोर तरळू लागतात तरीही दु:ख होत नाही. मात्र त्याला काळजी पडली आहे मित्राच्या प्रेयसीची. तीचे आता काय होणार? तिला स्वत:ची स्वप्नं उधळली तेंव्हा काय वाटलं असेल? हा विचार त्याच्या डोकीत येतो पण त्यावेळी त्याच्या प्रेयशीवर आपले पूर्वीइतके प्रेम राहिले नाही त्यामुळे तीची अवस्था काय होईल? याचा प्रश्न त्याला पडला नसेल का? ती त्याला लग्न करूया म्हणून सांगायला आलेय सर्व लग्नाची तयारी तिने केली आहे. पण तो आता नको पुढं कें व्हातरी असा म्हणतो. तिला तो टाळण्याचा प्रयत्न करतो. ती मात्र वेड्यासारखे तो तिच्या मुलाचा बाप होणार म्हणून विचारते, आपल्याला 'मुलगा होईल की मुलगी रे?' यावेळी त्याला तिचा विचार येत नसेल का? अशा वेगवेगळया व्यक्ती समाजात येतात. एक वेगळीच मोड घेणारी अशी ही कथा वाटते.

'दसरा उजाडला' सर्वात मोठा सण म्हणजे दसरा. ग्रामीण भागात तर दसरा या सणाला खूप महत्व आहे. या सणानिमित्त अनेक लोक साडेतीन मुहूर्तापैकी एक म्हणून सोनं, कपडे अशा वस्तू खरेदी करतात या दिवशी वेगवेगळी कामे करण्याचा निश्चय करतात आणि वर्षभर शब्द पाळण्यासंबंधी मनात आणतात. कोणत्याही नवीन कार्याला याच दिवशी हात लावतात तोच प्रकार कोत्तापल्लेंनी मांडला आहे. मोरूला मोरूचे आईवडील तोंड धुवायला, दात घासायला सांगतात. त्या दिवशी गोड खायला पैसे देतात. सर्वांना सोनं म्हणून शमीचा पाला देऊन नमस्कार करायला सांगतात. शमीच्या वृक्षावर पांडवाणी शस्त्रे ठेवली होती म्हूणून या दिवसाला महत्व असते. तांदळाच्या पिठाचा बळी तयार करून त्याच्या पोटावर चाकू फिरवला जातो आणि सर्वांना गोडधोड दिले जाते यासंदर्भात सर्व सणाचे चित्रण येते.

'वणवा' या कथेतील कथानायकाचे चाळीस वर्ष झाली तरी लग्न झाले नाही. रक्ताचं असं आई-वडील किंवा इतर कोणच नाही. लेण्यापाशी हा हर्सूलचा तलाव आणि उंच उंच डोंगर एवढेच रात्रंदिवस तेथे असतात. अनेक लोक लेणी पहायला येतात. गुराखी येतात, वेगाने फिरतात आणि परत जातात. याने स्त्री स्पर्श हा कधी अनुभवला नाही. पण तेथील एक पोरगा मात्र गंमती सांगतो त्यामुळेच यालापण काहीतरी वाटते. एक मानव म्हटल्यानंतर सुप्त भावना ह्या कोठेतरी असतातच. हा एक दगडी नर्तकीच्या मुर्तीजवळ जातो. त्यावेळी ती दगडी मुर्ती त्याला साक्षात जिवंत प्रतिमा सारखी वाटते. तो तिच्याशी

एकरूप होऊ पाहतो त्यावेळी नकळत त्याला वाटते की ही झिडकारेल. एक पंजाबी बाई लेण्यांचा अभ्यास करायला आली होती. तिच्याबरोबर पंधरा दिवस मजेत घालवतो. एक दिवस ती एक मुर्तीविषयी विचारते त्यावेळी तो सांगतो की आपण येण्यापूर्वीच तेथील मूर्ती चोरीला गेली होती. या गोष्टीचे तिला दु:ख होते त्यावेळी खांद्याचा आधार घेतो. हाच त्याचा पहिला स्पर्श होता पण तिला हे जाणवते.त्यावेळी लगेच ती झिडकारते आणि जाते. असेच यावेळी दगडी मुर्तीविषयी वाटते.त्यावेळी तेथील सगळ्याच दगडी मुर्त्या आपल्याकडे पाहून हसताहेत असे वाटते आणि तो त्यात पूर्ण जळून जातो. जेंव्हा तो त्यात जागृत होतो . त्यावेळी फक्त हर्सुलचा तलाव दिसतो आणि सरळ तो त्याच्यामध्ये जातो.

'ओहोळ' या कथेतील सदाशीव आणि वसुधा यांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे. वसुधा गरोदर आहे. तिच्याकडे पाहून एक महिण्यानंतर सुटका होईल याचं समाधान सदाशिवच्या चेहऱ्यावर दिसत होतं. वसुधाला पडलेल्या स्वप्नामुळे ती जागी होते आणि त्यांना स्वप्न सांगते. आपण दोघे फिरायला गेलो मध्ये आपलं लुटूलुटू चालणार बाळ आहे एवढेच. पण स्वप्न ही कधी खरी होतात का? म्हटले जाते स्वप्न जसे पडते त्याच्याउलट होते किंवा ज्याचा आपण विचार करत असतो तेच स्वप्नात दिसते. ' मनी वसे ते स्वप्नी दिसे.' वसुधा गरोदर असल्याने सदाशिवला जवळ घेत नाही त्याप्रमाणे तोही दूर असतो. पण त्याचा उतरलेला चेहरा तिला पहावत नाही. लोणी विस्तवाजवळ नेले तर थोडेच वितळायचे राहणार. त्याप्रमाणे हे एकत्र येतात आणि त्यात शेवट होतो तो तिच्या गर्भपातात. त्याचवेळी पाऊस धोधो पडत असतो आणि पाण्याचा तांबुस ओहोळ समोरून जात असतो. अगदी रक्तीम होऊन अशी सुखी संसारावर पडलेली दु:खद छटा दिसून येते.

'घर' घर! म्हणजे काय असत? चार भिंती त्यामध्ये एक जोडप आणि दोन - तीन कच्चीबच्ची असं नव्हे, तर घराला घरपण येण्यासाठी हवं असतं. त्या दोघांच्यामध्ये प्रेम, विश्वास आणि सहानभूती. पण हेच जर नसेल तर संसार सुरळीत चालू शकत नाही. या कथेतील नायक नायिका या दोघांचे पटतच नाही आणि हेच वर्णन कोत्तापल्लेनी चिमणा - चिमणींच्या स्वरूपात मांडले आहे. चिमणा - चिमणींच होत असलेल्या

आरशातील स्वत:च्या प्रतिबिंबविषयी भांडण आणि नंतर त्यांच्या दोघांच्यात होते. तिला बाहेरून येणारे फोन याविषयी त्या दोघांत भांडण दिसते या दोघांचे प्रत्यक्षातील भांडण दिसत नसले तरी चिमणा - चिमणीच्या स्वरूपात दिसून येते. चिमणी जेंव्हा घायाळ होते त्यावेळी ती पाणी घेऊन येते त्यावेळी मात्र तो पाणी पाजायला येत नाही. आणि शेवटी जेंव्हा फोन येतो त्यावेळी चिमणा फोनवर बसतो याचाच अर्थ स्वत:च फोन उचलतो. आरसा व्यक्तीचं फक्त बाह्यांग दाखवतो अंतरंग दाखवत नाही. व्यक्ती बाहेरून कितीही सुंदर किंवा कुरूप असल्या तरी तशाच असतात असे नाही, ते फक्त जवळचीच व्यक्ती जाणते हे कथेद्वारे जाणवते.

'पिंटीची गोष्ट' या कथेची नायिका पिंटी. पिंटीवर पहिल्यापासून शेवटपर्यंत कथा रंगत गेली आहे. लहान मूल नकळतच मोठयांचं अनुकरण करत असतात. त्यांना काही शिकवावं लागत नाही. दैनंदीन जीवनात जे घडत असते त्याकडे लहान मुलांच बारीक लक्ष असतं. काही समजत नसले तरी मोठ्या माणसांच्यात बसून त्यांचे बोलणे ऐकणे ,त्यात त्यांना गोष्टी सांगणे , ऐकणे हा एक छंदच असतो. पिंटी ही छोटीसीच आहे पण आपण रडत असताना आईवडील गोष्टी सांगून समजवतात त्याप्रमाणे वडीलांना गणित सुटत नाही म्हणून त्यांची नाराजी घालविण्यासाठी गोष्ट सांगते. पिंटीची गोष्ट चिमणीची आहे. त्यातील चिमणीचे घर मेणाचं आहे. चिमणी पिलांना दररोज खाऊ घालायची. तिच्या गोष्टीत वाघ येतो, लाच घेतो आणि चिमणीला सातासमुद्राच्या पलीकडे धान्य असल्याचे सांगतो. भग ती तेथून आणते. जंगलात दारूडे राक्षस असतात त्यामुळे चिमणीने खिडकी लावूण घेणे, पाऊस पाहण्यासाठी खिडकी उघडणे त्यात दिसलेले रस्त्यावरचे लालभडक पाणी आणि कुडकुडत बसलेला माणूस तिला दिसतो. त्याला ती बोलावते , तो झाडावर सरसर चढून चिमणीच्या घरात येतो. चिमणीने दिलेले कपडे घालतो आणि रग घेऊन झोपता, चिमणी उडून राणात जाते . जाताना त्याला मुले सांभाळायला सांगुन जाते पण तो बरे म्हणतो आणि कुदळ घेऊन घर पाडतो चिमणीची पिलं चिवचिव करत झाडावर बसतात आणि तो निघून जातो. जीवनात घडणाऱ्या घटनांचेच चित्रण त्यामध्ये मांडल्या आहेत.

'कंकालेश्वर' या कथेतील नायक कंकालेश्वरला गेला आहे. तिथे एक स्त्री

त्याला भेटली. तिने कंकालेश्वरचे पूर्ण मंदीर आजूबाजूचा परिसर दाखवला. मात्र महत्वाची गोष्ट म्हणजे ती त्या मंदीराचे महत्व वेगळेच सांगत होती. कंकालेश्वराच्या बाजूच्या तलावातले पाणी पावसाळ्यात कमी होते आणि उन्हाळ्यात वाढते असे म्हणते. त्या शहराचे पूर्वी चंपावतीनगर हे नाव होते. त्याचबरोबर ती सांगते की, मंदीरातील खांब मोजल्यानंतर सारखेच येत नाहीत. हे नायकाला वेगळेच वाटते त्यामुळे तो मंदीरात एकटाच येतो आणि खांब मोजायला लागतो. कित्येकवेळा खांब मोजतो. चौऱ्याऐंशीच येतात. मात्र मनात एखादी भिती घातली तर ती तशीच राहते , त्यामुळे मंदीरात येणारा कर्कश आवाज त्यामुळे त्याला भिती वाटते. लोक कितीही सुधारले तरी मनातील पहिल्यापासून घातलेली भिती तशीच राहते.

'दिवा' या कथेत पाऊस - पाणी नाही त्यात दुष्काळ पडणार ही भिती तोपर्यंत पाण्याविना जनावरं पटापट मरायलेत. लोकांनी जे करता येईल ते केले. मुसळाला बेंडकुळ्या बांधल्या, महादेव पाण्यात बुडून ठेवला, सगळ्या बायका रानात नागोळं नांगर घेऊन फिरल्या पण पाऊस काही आला नाही. सगळीकडे चहा पाण्यासाठी पैसा मिळत नाही. शेत, जनावर विकावित म्हटली तर घेणाऱ्याकडे सुद्धा पैसे नाहीत. शेवटी 'करून करून भागलं आणि देवपुजेला लागलं' म्हणतात त्याप्रमाणे अमावस्या पाहून गावातील लोक पंडरीच्या अंगात देवी आणतात. चाळीसवर्षामागेसुद्धा असाच पाऊस येत नव्हता त्यावेळी पंडरीच्या बापाला देवळात घेऊन गेल्यानंतर पाटलाला दिवा देवाला लावायला सांगतो. त्याप्रमाणे आता पंडरीच्या अंगात देव येते, तिही पाटलाला दिवा लावा म्हणून सांगते. रामा पाटील दिवा लावायला जातो , लोक म्हणत होते देवा नवस पूर्ण करतोय आता पाऊस येऊ दे. पण कथानायकाला वाटते, '' पाणी पडू ने. ढग आसेच पांगावेत. आन दिवा शिवंच्या पलिकडं पाटील आपल्या पत्नीकडं गेला की झालं...'' ४९ असे वाटण्याचे कारण म्हणजे कथानायकाच्या घरी रामा पाटील आपल्या पत्नीकडे येत होता याचा राग त्याला होता. त्यामुळे त्याला वाटते जर पाऊस पडले नाही तर पाटलाचा बळी घेतला जाईल. ग्रामीण भागात अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त असते त्यात काळी आई म्हणून जमिनीची पुजा करतो. पण जर त्यात धान्य पिकत नसेल तर लोक अन्न पाण्यावाचून कसे जगायचे त्यावेळी विश्वास नसला तरी लोक नको त्या मार्गाला धावतात.

'कथा: अख्या हिंमतरावाची' या कथेचा नायक हिंमतराव. हा अविवाहीत आहे. ऑफिसमध्ये जबरदस्त शिस्त लावतात. स्वत: बुलेट भरवेगात चालवतात त्याबद्दल तयांना अभिमान आहे. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची छाप सर्वांवर पडावी असे त्यांना वाटते. त्यामुळे ऑफिसात आल्या आल्या सर्वांना फैलावर घेतात. आपल्या चेंबरमध्ये आलेल्या प्रत्येक व्यक्तीवर प्रथम ते मोठ्याने बोलतात. आपला छाप तेवढा असावा म्हणून, पण प्रत्येकावर प्रेमही तितकेच असते ,म्हणून ते याकूबला वृद्ध आहे म्हणून रिटायर व्हायला सांगतात. पण प्रेमाखातर पैसे देतात. समोर कामानिमित्त आलेल्या व्यक्तीकडे लक्ष नसल्याचे दाखवतात ही त्यांची खास स्टाईलच आहे. मुलीनां कसं स्वत:च्या हाताखाली घ्यायचे हे त्याना चांगलेच माहित आहे. विद्यावर त्यांचे चांगलेच प्रेम आहे. विद्या लग्नाच्यपूर्वी स्पर्श करवून घेत नाही, त्यामुळे त्यांना राग येत असला तरीसुद्धा त्यांना विद्याच आवडते. ऑफिसात काम मागायला आलेल्या सुलभाला पाहून त्यात ती गरीब आणि सुंदर त्यामुळे साहेबांचे लक्ष तिच्यातच असते. ती कशी दिसत होती त्यातच ते मग्न होते. विद्यावर प्रेम जरी असले तरी शारीरिक भुक भागविण्यासाठी इतर मुली त्याना चालायच्या. वझेबाई आणि विद्या ह्या दोघींपण सारख्याच पण विद्याचा घेतलेला मुका हा त्यांना वेगळांच वाटतो. विद्याला लग्नापूर्वी काही करणं त्यांना अपवित्र वाटतं. त्यामुळे हिंमतरावाना विद्याबरोबर लग्न करण्याशिवाय पर्याय नसतो. याशिवाय त्यांना हवं ते सुख तिच्याकडून मिळणं शक्य नव्हते. हिंमतराव आपल्याला जे हवं ते मिळवत असले तर शेवटी विद्याच्याच मताचा विचार करताना दिसतात.

'कळा ज्या लागल्या जीवा' या कथेतील नायिका सुधा आहे. सुधाच्या डिलेव्हरीच्यावेळी तिला अकरा दिवसात आलेले वेगवेगळे अनुभव यामध्ये प्रकट केले आहेत. सुधाला झालेला मुख्य त्रास, त्यातून मृत्यू येईल यासंबंधी भिती, न सोसवणाऱ्या कळा त्यातून वाटतं कोणीही कोणाचं नसतं. एवढे होऊनही सुटका झाल्यानंतर उफाळणारे वात्सल्य प्रेम दिसून येते. त्या आठ दहा दिवसात येणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्य स्त्रिया अनुभवायला मिळतात. डॉक्टरीनबाईची शेती, बंगले, गाड्या एवढे असूनदेखील एका गरीब बाईला पैसे मिळत नाहीत त्यात पतीची नोकरी गेली त्यामुळे बिल भरायला होत नाही तर त्या चक्क तिला जमिनीवर झोपायला लावतात. घरीपण पाठवत नाहीत.

दुसऱ्याला उपदेश देणाऱ्या मात्र स्वत: चौथ्या मुलाला जन्म देणाऱ्या शिक्षिका. हिच्यासारखीच तालुक्याच्या आमदारबाई ह्यासुद्धा सहाव्या वेळेला डिलेव्हरीसाठी आलेल्या आहेत. ज्या सर्वांना ज्ञान देणाऱ्या, सुखी संसाराची सुत्रे सांगणाऱ्या व्यक्ती त्यांचीच मुले किती असतात त्यातील एक नमुना म्हटले तरी चालेल. त्याचबरोबर सोळा - सतरा वर्षाच्या मुलीला झालेली मुलगी त्यात तिचा नवरा अपघातात गेला याच एक वर्णन आले आहे. त्याचप्रमाणे डिलेव्हरीला आलेली आणखी एक बाई. सुटका व्यवस्थीत झालेय पण तिला पहायला कोणी येत नाही. एक मुलगा डबा घेऊन येतो आणि आदळून जातो. अशा वेगवेगळया स्त्रिया तिला दिसतात. एकंदर सर्वांना डिलेव्हरीसाठी किती यातना सहन कराव्या लागतात हे चित्र पहायला मिळते.

''विदूषक'' या कथेचा नायक कौंडिण्यधिपती राजाधिराज हेमंतकुमार महाराज हे आहेत. यांना एक दिवस राजधानीचा कंटाळा येतो,त्यामुळे राजधानी सोडून बाहेर जायचे ठरवतो. जाताना आवश्यक अशा दोनच व्यक्ती विदूषक आणि खानसाम्या यांना घेऊन जातो. राजा म्हटल्यानंतर केंव्हा कोणता मुड येईल सांगता येत नाही. राजाला सतत राजविलासात आनंदात राहून माहित आहे. त्याना कधी दु:खाचा प्रत्ययच येत नाही त्यासाठी विदूषकाला दु:खाचा प्रत्यय येणारी गोष्ट सांगायला सांगतात. विदूषक हा दररोज हसविणारा, हसविण्यापलीकडे त्याचे काहीच काम नसते. यावेळी मात्र राजाचा हकूम असा की विदूषकाने दु:खाचा प्रत्यय येणारी गोष्ट सांगावी. राजाने विदूषकाला सतत हसताना पाहिले आहे, त्यामुळे त्याने कितीही दु:खाचा प्रत्यय येणारी गोष्ट सांगितली तरी राजाला पटत नाही. विदूषक स्वत:च्या जीवनात आलेल्या दु:खाच्या घटना सांगतो पण राजाला विदूषकाकडे पाहून खरं वाटतच नाही. सिंहाच्या पिलाला जर जन्मापासून मेंढरातून घातले तर ते त्याच्यासारखेच वागायला लागते. त्याप्रमाणे या विदूषकाच्या संदर्भात राजाला वाटते.

'विनोद' यामध्ये मोहन हा कथेचा नायक आहे. मोहन एम. ए. झालेला आहे. गोल्ड मेडल मिळाले आहे तरीसुद्धा नोकरी नाही. शिष्यवृत्या मिळायच्या त्यात शिक्षण होत होतं. जात, गरिबी, वशिला या कारणाने नोकरी मिळत नाही. माधव बोलवतो पण चोरटे व्यवहार करायला मोहनला आवडत नाही. आईतर मोहन नोकरी करत नाही म्हणून

त्याला काहीही बोलत असते. मोहन पत्रकार होता. काहीतरी बातम्या द्यायचा त्याच्यात थोडे पैसे मिळायचे पण यावरून थोडेच घरखर्च चालणार आहे. एकदिवस मनोहरराव मोहनला घेऊन शिवाजीरावांच्याकडे जातात. शिवाजीरावांना भिती होती आपली बातमी मोहन देईल म्हणून. त्यासाठी त्याला बोलवून घेतले जाते. शिवाजीराव आणि मनोहरराव काय सांगतात हे मोहन ऐकून घेत नाही, पण जेंव्हा मनोहरराव त्याच्या वर्मावर बोट ठेवतो,

'' अरं गप, घरात नाही दाणा, अन् म्हणे मला बाजीराव म्हणा.

मारतोया गप्पा. फार शहाणा झालास का? '' ५० यावेळी मात्र अपमान होतो, थोडी बाचाबाची करतो पण नंतर वळणावर येतो.

शिवाजीराव जेंव्हा पंधराशे रूपये मोहनला देतात हे पाहून एका बातमीचे पैसे एवढे असू शकतात याविषयी आश्चर्य वाटते. मोहन पैसे स्वीकारतो पण जर शिवाजीराव त्याला मंडळाच्या कॉलेजमध्ये नोकरी देणार असतील तरच. याउलट शिवाजीराव मोहन आपला गुलाम म्हणून राहील या दृष्टीने त्याला नोकरी देतात. यावरून माणसाच्या हाती पैसा लागला तर ती व्यक्ती कोणत्याही पातळीवर जाऊ शकते हे प्रकर्षाने जाणून येते या प्रकरणात काही फौजदार, डी एस पी सारखे लोकसुद्धा अशा व्यक्तींची कामे करतात हाल मात्र गरीब, दलीत मुला-मुलींचे होताना दिसतात.

''इत्यंभूत'' या कथेमध्ये इनस्पेक्टर देशमुख यांनी पाटील नावाच्या नटराज फायनान्स कंपनीत काम करणाऱ्या एका व्यक्तीला शिरसाळकर समजून आणले आहे. याला एक मुलगी आणि पत्नी आहे. शिरसाळकरानी मात्र कारखानदाराचा खून केला आहे. त्याने मागे कोणतीच निशाणी ठेवली नाही. मात्र पाटील किती जीव तोडून सत्य सांगतो पण इन्स्पेक्टरला खरं वाटत नाही. शेवटी शिरसाळकर नावाची व्यक्ती सापडते इन्स्पेक्टर मात्र सरळ जाहीर करतो की मी जो पकडलाय तोच शिरसाळकर आता खरा शिरसाळकर सापडला तरी उपयोग नाही. स्वत:च्या स्वार्थापोटी अनेक व्यक्ती दुसऱ्याचा विचार करत नाहीत.

''कोर्टाचा हँग ओव्हर'' या कथेमध्ये कोर्टाचे मित्र त्यांच्या घरी येतात. मैफील चांगलीच रंगते, शेवटी केस मित्रमंडळींच्याच बाजूने कशी होईल यासंदर्भात चर्चा

होते रात्री जेवण, पेग मध्ये रात्र रंगूण जाते. मित्र रात्रीच्या रात्रीच निघून जातात. रात्रीच्या ज्यादा झालेल्या पेगचा परिणाम मात्र कोर्टावर होतो. आजारी पडतात त्यात पत्नी सेवा करते. त्यों अंग तापल्याने सौ. कोर्ट घाबरतात आणि एका वकीलाच्या अंगात प्रत्यक्ष भवाणी माता येते त्यांच्याकडून अंगारा आणतात. अंगारा सर्व अंगभर लावल्यानंतर कोर्टाला वाटते आणखी एक पेग घ्यावा आणि पेग घेतल्यानंतर लवकरच आराम वाटते. मातेनंच आपल्याला ही सुबुद्धी दिली असे त्यानां वाटते आणि ते ठरवतात की आता आपले पाप मातेला अर्पण करून मुक्त झाले पाहिजे त्यासाठी तिकडे जायला पाहिजे शेवटी आपण एखाद्या दु:खात किंवा अडचणीत असू तेंव्हाच आपण केलेल्या कृत्याची, पापाची जाणीव होते. पापाच्या पहिल्या क्षणीच जर आपण मात केली तर आपल्या हातून असे घडणार नाही.एकदा जर पाप लपवलं तर आपल्या हातून असे नकळत घडतच जाते. अशीच कृत्ये कोर्टच्या संदर्भात झालेली दिसतात.

''हकीकत: वास्तवातली'' या कथेमध्ये ऑफिसमधील मैत्रीचे जीवन दिसते. राघव हा आजारी आहे हे साहेबांना समजताच ऑफिसमधल्या सर्वा घेऊन जातात. साहेबाना वाटते ऑफिसचे वातावरण अगदी होमली असावं. राघव तसा काही जास्त आजारी नाही पण त्याला अचानक एक अनोळखी व्यक्ती भेटते. पन्नास वर्षांचा लांबसडक, पांढरेपणाकडे झुकलेली दाढी, अंगात लखनबी झब्बा, सुरवार आणि डोक्यावर पगडी असणारे व स्वत:ला हैद्राबादचे नबाब समाजणारे भेटतात. ते राघवला आपल्या घरी येऊन आपल्या सुंदर वेड्या मुलीच्या सहवासात तसेच संभोग ठेवायला सांगतात आणि नाही आलातर आपल्याशी गाठ असल्याचे सांगतात, त्यामुळे राघव आजारी पडला आहे. डिसोझा या त्याच्या मित्राला माहीत असल्याने तो सरळ सरळ सांगतो की ती व्यक्ती दुसऱ्यांना आपल्या आत्मविश्वासामध्ये घ्यायला खोटं खोटं सांगते अशा वेगवेगळ्या व्यक्ती नकळत जीवनाच्या वाटेवर भेटून जातात याचे चित्रण कोत्तापल्लेनी केले आहे.

'' बाहुल्यासारखा'' या कथेतील कथानायक हा एक चित्रपट पाहून आला आहे आणि त्यातील एका भूमिकेमुळे त्याला त्याच्या प्रेयसीची आठवण झाली आहे. त्याच्यात तो स्वप्न रंगवतो. ती आपल्याला भेटायला आल्याच आपण तिचीच वाट पाहत

आहोत. वाट पाहताना आलेले अनुभव आणि ती आल्यानंतर तिची केलेली स्तुती . याला सोडून जाताना होणारी परिस्थिती तिच्या प्रत्येक गोष्टीविषयी तो स्वप्न रंगवतो आणि ती निघून गेल्यावर त्याच्यातच हरवून बसतो. असा हा बाहुल्या - सारखाच नायक दिसून येतो.

''पूरूष'' यामधील नायक आपल्या पहिल्या पत्नीला भेटायला येतो . तिचेही लग्न झालेले आहे. त्यांच्यामध्ये पूर्वी प्रेम होते पण आईच्या इच्छेखातर तो तिला सोडून देतो. तिची त्याला आता आठवण येते त्यामुळे भेटायला येतो .मात्र ती आपल्या पतीप्रमाणे वागत नाही. आता ती अहोजावोने बोलवते. त्याच्यासमोर त्याला बोचेल असे शब्द वापरते. आपल्या नवीन पती मुकुंदाविषयी स्तुती करताना दिसते. असे जरी करत असली तरी त्यांचा संसार कसा चालतोय, त्यांचा मुलगा कसा वागतोय याकडे तिचे बारीक लक्ष आहे. एकदा घटस्फोट दिल्यानंतर एकमेकांत कशाप्रकारचे बंधन निर्माण होते. पाहिल्यासारखे ते वागू शकतात का? किंवा ते एकमेकाला आपल्या इच्छा लादू शकतात का? हे या कथेद्वारे समजून येते.

''फसवणूक'' मध्ये नायकच स्वत:कसा फसत गेला हे दिसते. एकदाच नव्हे कित्येक वेळा तो आत्महत्या करण्याचे ठरवितो. पण त्याच्या हातून ते शक्यच होत नाही. एकदा आत्महत्या करायला गेला. त्याने ठरविले गळयात दगड बांधून विहीरीत उडी मारायची पण त्यावेळी त्याला वाटते विहिरीच्या तळाशी काहीतरी असेल आपण मरणारच आहोत याच त्याला त्यावेळी भान नाही. खळखळून हसणाऱ्या व्यक्तींची त्याला भिती वाटते. कोणत्याही कारणाने दुसरी व्यक्ती हसली तरी आपल्यासंदर्भात त्याला समजले असावे असे त्याला वाटते. ऑफिसमधील साहेब याला त्याच्या गरिबीचा फायदा घेऊन मुद्दाम फाईल घेऊन घरी दररोज पाठवतात. कारण त्यामुळे आपल्या आंधळ्या मुलीशी त्याची मैत्री वाढेल. याप्रमाणेच त्याची त्या मुलीशी मैत्री वाढते. एक दिवस या कथानायकाच्या वडिलांच्या मृत्यूनंतर दु:ख अनावर न झाल्याने त्या मुलीशी मिठी मारून रडतो. त्याच्यातच नकळत त्याच्या हातून चुक होते. आपण आंधळ्या मुलीला फसवलो असे त्याला वाटते पण हाच स्वत: त्यात फसतो. साहेबांना हे प्रकरण माहीत होते पण पुन्हा त्याला घरी पाठवतात त्यावेळी हा जात नाही. त्यावेळी साहेब नोकरीवरून काढून

टाकण्याविषयी धमकी देतात त्याचे त्याला काहीच वाटत नाही. त्याला काय खाशील याप्रमाणे प्रश्न विचारतात. त्यावेळी तो अगदी आत्मविश्वासाने म्हणतो, 'आत्महत्या करीन' हीच याकथेमधील कथावस्तू आहे.

''पाठलाग'' या कथेतील नायक रघू. रघूचे एका विवाहित बाई राणीवर प्रेम आहे. राणीला घेऊन तो अजंठा - वेरूळ लेण्यातून फिरायला घेऊन जातो. तो तिला आपल्याबरोबर यायला सांगतो पण पती प्रेमापोठी ती नाही म्हणते. यानंतर रघ्याचे मंदा या मुलीशी लग्न होते. त्याला वाटते मंदाबरोबर संसार असा करायचा की राणीचीसुद्धा दृष्ट लागायला हवी. सर्वांनाच आवडेल अशी सुंदर मंदा होती रघुला ती आवडली होती पण राणीवर प्रेम असल्याने मंदाच्या ठिकाणी त्याला राणी दिसत असे. मंदाबरोबर पुढील संसाराबद्दल चर्चा करत असताना त्याला मंदाच्या ऐवजी राणीनेच नाव त्याच्या तोंडात येत असते. मंदाबरोबर काहीतरी स्वप्न पहायचे म्हटले तरी त्याला तिच्या ठिकाणी राणीच दिसते. शेवटी पहिले प्रेम हे काहीही केले तरी आपला पाठलाग काही सोडत नाही हे या कथेद्वारे आपल्याला दिसून येते.

''काळोखात उतरून'' कथानायक स्वत:तच स्वत:ला शोधू पाहतोय. आपलं अस्तित्व कोठे आहे हे पाहतो आहे. स्वत:चे विचार दुसऱ्यासमोर मांडू शकत नाही किंवा त्याप्रमाणे तो वागू शकत नाही. त्यामुळे तो युधिष्ठीर सारखा अधांतरीच आहे. श्रीमंत लोक श्रीमंतच होताहेत, बिल्डींगा चलताहेत, रिक्षा, मोटारी इत्यादी सर्वच काही घड्याळाच्या तालावर चालत आहे. गरीब मात्र गरीबीतच राहतो आहे. सामान्य माणसाला राहायला कोठे जागा नाही स्वत:ची खळगी भरावी म्हटलं तरी मुश्कील. त्यांनी फक्त स्वप्नंच पहायची. एखादी व्यक्ती काहीतरी करू पाहते, पण त्यावेळी मात्र तिच्याकडे पाहिले जात नाही आणि तिच व्यक्ती मेली तर त्याचे महत्व त्याना वाटते. मग जयंती , उत्सव साजरे करतात त्यावर भाषणे ठेवतात. माणसाचे अस्तित्व कसे असते आणि गल्ली गाव कसे ओळखायचे याचे चित्रण या कथेतून झाले आहे.

''चक्र'' या कथेचा नायक बापू आहे. बापूभोवतीच कथा रिंगण घालताना दिसते. मध्यरात्र त्यात पाऊस आणि याच वेळी बापूच्या बहिणील डिलेव्हरीसंबंधीचा

त्रास, त्याचवेळी त्याचा मित्र सुरेश याचा दादा मरतो या सर्व पेचात बापू सापडला आहे. तो आणि सुरेश प्रथम मास्तरांना सांगून नंतर सुरेशच्या दादाकडे येतात. सुरेशचे पाहुणे मंडळी कोणी नाही जवळपास त्याच्या जातीतले नाहीत किंवा गावातील लोक सुरेशच्या घरी येत नाहीत. फक्त स्त्रिया सुरेशच्या दादाला पाहतात आणि निघून जातात. शेवटी पाटलोबातात्याना बोलवून बापू आणतो. पाटलोबातात्यानी तशी कामे चांगली केलेत गावात लाईट, मॅट्रीकपर्यंत शाळा, इतर छोट्यामोठ्या सोई केलेत. याना समजताच आपल्या चार लोकांना घेऊन येतो. तेथील सर्व काम कथानायकावरच असते. रॉकेल नाही त्यात पाऊस त्यामुळे प्रेत कसे घेऊन जायचा हा प्रश्न. शेवटी प्रेत घेऊन गंगार्पन कलं जातं. काहीवेळा अशी वाईट परिस्थिती निर्माण होते त्यात घरची गरीबी म्हटल्यानंतर खूपच हाल होतात, त्याचे चित्रण कोत्तापल्लेंना अस्सलपणे चित्रित केले आहेत.

''राखण'' मध्ये धोंडीबा पनघट हा मुख्य नायक लहानपणापासून अगदी लाढात वाढलेला खाऊन पिऊन सुखी असा हा गृहस्थ आहे. पंचविस - तीस एकर जमीन त्यात सात आठ एकर पाणभरतीची, त्यामुळे कशालाच काही कमी नव्हते. याच्यावर कोणतेच काम नव्हते . आई धोंडीबाच लग्न करते. धोंडीबाला लग्नाचा एक बोझच वाटतो अगदी हा सांगकाम्या प्रमाणे लोक काय बोलतील तेच खरे मानून तसाच वागतो.सासू मुलगीला सांभाळून घ्यायला सांगते. त्याचबरोबर वेडं कोकरू, मोकळं चाकळ वागायची सवय आहे असे औपचारीकरीत्या सांगते पण याचा भलताच अर्थ हा होतो. मित्र बायकोला ताब्यात कसे घ्यायचे हे मार्ग सांगतात. त्यात पत्नी सुंदर नाजूक म्हटल्यानंतर धोंडीबाला सांभाळणे मुश्कीलच वाटते. तो लग्नानंतर दररोज एकटीला कोठेच सोडत नाही. पाहुण्यांना घरी बोलावत नाही, मित्रांना घरी घेत नाही, सतत कोठे जाईल तिकडे हा तिच्या पाठीमागून जात होता. हे अती होत होते त्यामुळे शेवटी सुंदरा धोंडीबाच्या या वागण्याला कंटाळून त्याला फसवुन पळून जाते. कोणतीही गोष्ट आपण अति करायला गेलो तर शेवटी त्याची मातीच होते.

''मया'' मधील हरबा हा मुख्य. त्याची पत्नी आठव्यांदा गरोदर आहे. मुलांना शाळा शिकवू इच्छितो, पण खर्च झेपत नाही. पोटासाठी सगळेच कष्ट करतात. डालग्या तयार करून विकणे हा त्यांचा व्यवसाय पण हा ही चालत नाही. कोण पैसे देत नाहीत.

बाळंतपण तसेच इतर खर्चासाठी पैसा नसल्याने हरबा डुकराच्या चार पिलाना विकायचा विचार करतो. त्यावेळी घरी चालून एक गिऱ्हाईक येते. याना खूपच आनंद होतो. पंडरीला हरबा पिलं कशासाठी पाहिजे म्हणून विचारतो , त्यावेळी पंडरी पाहुण्याना खुष करायच आहे असे सांगतो. त्यावेळी हरबाच्या डोळ्यांसमोर पिलांचा आक्रोश, झाडाला उलट टांगून भाजण्याचे दृश्य दिसते आणि पिलं विकायची नाहीत म्हणून सांगून टाकतो.

घरी शेवटी आर्थिक टंचाई असताना त्यात घरात महत्वाच्या अडचणी आल्या असतानासुद्धा जिवंत मुक्या प्राण्यांच्यावरती प्रेम करणारा हरबा दिसतो. त्यांच्या कथांतून तळागळापासून उच्च वर्गापर्यंतच्या सर्व व्यक्ती डोकावताना दिसतात. त्यानी सरळ सरळपणे भ्रष्टाचारी लोकांचे चित्रण केले आहे. तसेच एका स्त्रीला होणारा त्रास जणू काय आपण एक स्त्रीच असावे त्याप्रमाणे अस्सलपणे मांडला आहे. लहानमुले यांचे जीवन, इतर साजरे केले जाणारे सण - समारंभ मांडताना दिसतात. अविवाहित व्यक्तींचे जीवन, आई - मुलगा यांच्यातील संबंध, तसेच पती - पत्नीमधील प्रेम, भांडणे याचे चित्रण केले आहे. अशा वेगवेगळया व्यक्तींचे दर्शन नकळतच आपल्या जीवनात होऊन जाते. पण त्याचे चित्रण करण्याची शैली मात्र काहीनांच असते. त्यापैकीच एक म्हणजे नागनाथ कोत्तापल्ले. हे अगदी व्यक्तींच्या भावनेला हात घालून साहित्याची मांडणी करताना दिसतात.

## सारांश

नागनाथ कोत्तपल्ले यांच्या 'काफिला' आणि 'संदर्भ' या दोन कथासंग्रहतील अभिव्यक्ती पाहताना त्यामध्ये प्रामुख्याने भाषाशैलीचा अभ्यास केला. कारण भाषा हाच कथेचा प्रमुख घटक आहे. भाषेद्‌वारेच विचार, भावना, अनुभव, स्वभाव आपण व्यक्त करू शकतो आणि जे व्यक्त करतो ते एक प्रकारच्या शैलीमध्येच असेल, तरच ते वाचकाला समजू शकते. त्याच्यां शैलीमुळे व्यक्ती ओळखता येते. यानंतर पहिले त्यांची निवेदनाची पद्धत. निवेदन हे प्रथमपुरूषी आणि द्वितीयपुरूषी अशा दोन भागात विभागते .त्यांचे कधी सरळ, निवेदन, तर कधी हकिकत - वृत्तांत कथनाचा आविर्भाव, तर कधी पुराणकथांचा पेहराव यामधून त्यांच लेखन प्रत्ययकारी होताना दिसते. कथेला रंगतपणा

आणण्याचे व एकाचवेळी सरळ त्या विषयाची मांडणी करणे हे निवेदनपध्दतीमध्ये महत्वपूर्ण ठरताना दिसते.

निवेदनाइतकेच संवादलेखनाला महत्व असते. कथांमध्ये संवाद हे शक्यतो जास्त प्रमाणात नसतात पण जर कथेमध्ये जसच्या तसे त्यांच्या भाषेत संवाद मांडले ती साहित्यात एक वेगळेपण येते. यांच्या कथासंग्रहामधून ग्रामीण कथांतून त्यांच्या अस्सल बोलीभाषेतील संवाद मांडले आहेत. तर काही ठिकाणी सुशिक्षित लोकांच्यातील संवाद, नागरी लोकांच्यामधील संवाद हे मांडलेले आहेत. अनुभवविश्व व समाजदर्शन व समाजदर्शन यालाही तितकेच महत्व आहे. कारण अनुभव घेतल्याशिवाय कथा मांडू शकत नाही कारण अनुभवातूनच व्यक्ती शिकत असते. त्याचबरोबर साहित्यामध्ये त्या त्या काळखंडातील किंवा त्या वेळेचे नकळत झाले ती समाजदर्शन घडते. याच्या कथासंग्रहातून समाजाचे दर्शन होते यामध्ये दुष्काळाचे चित्रण जास्तप्रमाणात आहे. तसेच तेथील अजंठा, वेरूळ, तेथे येणारे जाणारे लोक दिसतात. सण - समारंभ साजरे करण्याची पद्धत याचेही चित्रण यामध्ये दिसते. महत्वाचे म्हणजे कोणताही लेखक जेंव्हा कलात्मक निर्मिती करत असतो त्यावेळी तेथील जीवनानुभवांना अत्यंत महत्वाचे स्थान असते.

कथेचे अनेक विषय असतात पण त्यात नेमके काय मांडायचे ही लकब लेखकाची असते. कथावस्तूला योग्य रूप देऊन कथावस्तू यशस्वी करणे अवघड काम असते. मात्र कोत्तापल्लेंनी विषय अगदी समाजात घडणाऱ्या दैनंदीन कार्यावर त्यातल्या त्यात महत्वाचे म्हणजे व्यक्ती - व्यक्तींच्या वर्तनाचे चित्रण केले आहे. उच्च वर्गापासून तळागाळातील लोकापर्यंत तसेच अजंठा वेरूळच्या लेण्याचे वर्णन कथांतून केलेले आहे. कथेचा प्रारंभ आणि शेवट वेधक आणि काळजीपूर्वक घेतलेला आहे, त्यामुळे त्यांच्या कथा अस्सल वाटतात.

# संदर्भ - टिपा


१. फडके, ना.सी : 'प्रतिभासाधन'
पृ.क्र. २२९

२. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथममावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. ५३

३. तत्रैव पृ.क्र. ५८

४. तत्रैव पृ.क्र. १९

५. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. ९३

६. तत्रैव पृ. क्र. ८५

७. तत्रैव पृ.क्र. ११७

८. तत्रैव पृ.क्र. ९७

९. तत्रैव पृ.क्र. १०२

१०. तत्रैव पृ.क्र. ११७

११. तत्रैव पृ.क्र. ९३

१२. तत्रैव पृ.क्र. ६१

१३. तत्रैव पृ.क्र. ८४

१४. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. २६

१५. कोत्तापल्ले, नागनाथ ; 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. ९५

१६. तत्रैव पृ.क्र. ८८

१७. तत्रैव पृ.क्र. ११९

१८. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र.४३

१९. तत्रैव पृ.क्र. १९

२०. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. ११३

२१. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र.४२

२२. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. ९५

२३. तत्रैव पृ.क्र. ४८

२४. तत्रैव : पृ.क्र. ६०

२५. कोत्तापल्ले, नागनाथ 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. ४९

२६. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. २५

२९. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. १९

३० तत्रैव पृ.क्र. ४९

३१. तत्रैव पृ.क्र. ४४

३२. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती १९८१
पृ.क्र. ५०

३३. तत्रैव पृ.क्र. ४६

३४. तत्रैव पृ.क्र. ८९

३५. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. १-२

३६. तत्रैव पृ.क्र. ५

३७. तत्रैव पृ.क्र. ९०, ९१

३८. तत्रैव पृ.क्र. १२४,१२५

| | | | |
|---|---|---|---|
| ३९. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘काफिला’<br>शारदा प्रकाशन, नांदेड<br>प्रथमावृत्ती जुलै १९८१<br>पृ.क्र. ११ |
| ४०. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘संदर्भ’ पृ.क्र. ८४ |
| ४१. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘काफिला’<br>पृ.क्र. ५६ |
| ४२. | तत्रैव | | पृ.क्र. ३३ |
| ४३. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘संदर्भ’<br>प्रचार प्रकाशन, कोल्हापूर<br>पृ.क्र. ६० |
| ४४. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘काफिला’<br>शारदा प्रकाशन, नांदेड<br>पृ.क्र. १७ |
| ४५. | तत्रैव | | ६६, ६७ |
| ४६. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘संदर्भ’<br>प्रचार प्रकाशन, कोल्हापूर<br>पृ.क्र. १०९ |
| ४७. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘काफिला’<br>शारदा प्रकाशन, नांदेड<br>पृ.क्र. ६ |
| ४८. | तत्रैव | | पृ.क्र. ११ |
| ४९. | तत्रैव | | पृ.क्र. ६८ |
| ५०. | कोत्तापल्ले, नागनाथ | : | ‘संदर्भ’<br>प्रचार प्रकाशन, कोल्हापूर<br>प्रथमावृत्ती १९८३<br>पृ.क्र. २४ |